रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २६७
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १६ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



खारघर : ज्येष्ठ निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना देण्यात येणाऱ्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे वितरण रविवारी होणार आहे. या सोहळ्यासाठी आप्पासाहेब धर्माधिकारी हे सहकुटूंब नवी मुंबईत शनिवारी समुद्री मार्गाने दाखल झाले. या वेळी त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या वेळी रायगड भूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, समीरदादा धर्माधिकारी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



# नवी मुंबईतील ग्रामस्थांना पालिकेचा दिलासा

## घरांच्या मालमत्ताकरावरील दुप्पट शास्तीला स्थगिती

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील २९ गावांतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांच्या मालमत्ताकरावर लादलेली दुप्पट शास्ती वसुलीला नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी शासन आदेश येईपर्यंत स्थगिती दिली आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या घरांवर आकारलेला मालमत्ताकरमाफीबाबत बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सतत पाठपुरावा केला आहे. त्यानंतर त्यास स्थगिती देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्याअनुषंगाने प्रकल्पग्रस्तांनी मालमत्ताकर भरणे बंद केले आहे, तो भविष्यात आणखी वाढू नये म्हणून शासन निर्णय येईपर्यंत दुप्पट शास्तीला आयुक्तांनी गुरुवारी स्थगिती दिली. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना दिलासा मिळाला आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील २९ गावांतील स्थानिकांनी गरजेपोटी घरांचे बांधकाम केले आहे. त्यावर नवी मुंबई पालिकेने शास्ती लावून मालमत्ताकर वसुली सुरू केली होती; परंतु त्यास स्थगिती देण्याची मागणी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी केली होती. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आमदार मंदा म्हात्रे यांच्या त मागणीनुसार नगरविकास विभागाने १५ मार्च २०२३ रोजी नवी मुंबई महापालिका आयुक्तांना अहवाल सादर करण्यास सांगितले होते, परंतु त्या प्रकल्पग्रस्तांनी आश्वासनानंतर मालमत्ताकर भरणे बंद केले आहे. त्यामुळे त्याची थकबाकी वाढत असून, त्यात आणखी वाढ होऊ नये म्हणून शासनाचा आदेश येईपर्यंत शास्ती वसुलीला स्थगिती देत असल्याचे पत्रात म्हटले आहे.

### शासन स्तरावरून निर्णय

**शासनाच्या अंतिम निर्णयानुसार राहून उक्त वस्तुस्थितीचा विचार करता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ५१ अन्वये आयुक्तांना असलेल्या अधिकारांचा वापर करुन प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या अवैध घरांना मुळ मालमत्ता करावरील आकारण्यात आलेली दुप्पट शास्ती वसुल करण्यास शासन स्तरावरून निर्णय प्राप्त होईपर्यंत तातुपरती स्थगिती देण्यात आली आहे. प्रकल्पग्रस्तांना फक्त मुळ मालमत्ता कर भरणेस अनुमती देण्यात येत असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे.**



मुख्यमंत्र्यांनी, सचिव, नगर विकास विभाग यांना नवी मुंबई पालिकेच्या दंडात्मक कर आकारणी प्रकरणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले होतें त्यानुसार शासन पत्रास अनुसरुन १५ मार्च २०२३ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक अहवाल उपसचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांना नवी मुंबई पालिकेने आदेशार्थ पाठविण्यात आलेला आहे.

याबाबत मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असल्याने उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होऊ नये म्हणून शासनाकडून या निर्णयाची अंमलबजावणी कशाप्रकारे करायची याबाबत नवी मुंबई पालिकेने शासनाकडे मागितलेले आहे, परंतु याबाबत शासनाकडून अदयापपर्यंत कोणतेही मार्गदर्शन अथवा आदेश प्राप्त झालेले नाही, असे पालिकेने पत्रात म्हटले आहे.

सद्यस्थितीत लोकप्रतिनिधीच्या विनंतीच्या अनुषंगाने निर्णय शासनस्तरावर प्रलंबित असल्याने बहुतांश प्रकल्पग्रस्त मालमत्ता कर भरत नाहीत. त्यामुळे अशा थकीत करावर नियम ४१ चीदेखील शास्ती अनुज्ञेय होऊन थकबाकीच्या रकमेमध्ये वाढ होताना दिसते.

# डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा 'जागर'

## ऐरोलीमध्ये अनोख्या पद्धतीने आदरांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी होते. ऐरोली येथील नवी मुंबई महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात अनोख्या पद्धतीने डॉ. बाबासाहेबांना आदरांजली वाहण्यात येते. बाबासाहेबांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून 'जागर २०२३' या विशेष कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व, त्यांचे कार्य, सर्वसामान्य जनतेपर्यंतपर्यंत पोहचवण्याचे काम विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या व्याख्यानातून केले जात आहे. त्यामुळे या स्मारकाचा उल्लेख ज्ञानस्मारक म्हणून केला जातो.



या ज्ञानस्मारकात डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त हजारोंच्या संख्येने नागरिकांनी भेट देऊन डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. रात्री १२ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत पाच हजारांहून अधिक नागरिकांनी या ठिकाणी भेट दिली होती.

विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या या स्मारकामध्ये डॉ. बाबासाहेबांचा संपूर्ण जीवनपट डोळ्यासमोर उभा राहत आहे असे इथे भेट देणारे नागरिक सांगतात. यापूर्वी कधीच न पाहिलेले बाबासाहेबांचे फोटो, त्यांनी लिहिलेली दुर्मीळ पत्रे, त्यांच्या जीवनातील घडलेल्या महत्त्वाच्या घटना आणि त्यांची कधी न पाहिलेली छायाचित्रे बघण्यासाठी नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली.

स्मारकामध्ये बाबासाहेबांच्या जीवनचरित्राचे दर्शन घडविणाऱ्या दुर्मीळ छायाचित्रांचे दालन पाहून डॉ. बाबासाहेबांचा जीवनप्रवास प्रत्यक्ष पाहत एक वेगळा अनुभव भेट देणारे नागरिक घेऊन जात आहेत. इथे असलेल्या ऑडिओ व्हिज्युअल सुविधांनी परिपूर्ण इ-लायब्ररीसह समृध्द ग्रंथालयाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथसंपदेचा हिमालय किती मोठा आहे, याची प्रचिती नागरिकांनी घेतली. भेट देणाऱ्या अनेकांनी या समृद्ध ग्रंथालयात बाबासाहेबांची पुस्तके वाचत बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली अशी वाचन संस्कृती स्वतःमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. अत्याधुनिक होलोग्राफीक आभासी चलचित्रप्रणालीव्दारे डॉ. बाबासाहेबांचे प्रत्यक्ष असलेले भाषण अनेकांना मंत्रमुग्ध करत आहे. हे स्मारक कायम सगळ्यांसाठी खुले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीदिनी भव्य मिरवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तथागत मित्र मंडळ लोकमान्य नगर रेल्वे स्टेशन रोड पनवेल यांच्या कडून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य मिरवणूक लोकमान्य नगर भगत चाळ, मालधक्का, रेल्वे पार्किंग, नवनाथ नगर वसाहत, शिवाजी नगर वसाहत, लाईन आळी, आदर्श हाटेल, छत्रपती शिवाजी महाराज सर्कल, पटवर्धन दवाखाना, ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली.





भाजप पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका सुशीला घरत, ॲड. वृषाली वाघमारे, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते जितेंद्र वाघमारे, युवा नेते प्रतिक बहिरा, सामाजिक कार्यकर्ते राजू बगाटे आदींनी या मिरवणूकीमध्ये सहभाग घेतला होता.

या वेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, किरण वाहुळकर, सर्जेराव साळवे, राजू झिरे, राजू बोदडे, प्रकाश बोरुडे, विजय झिरे, योगेश खरात, उमेश कांबळे, गणेश जाधव, विनोद बोदडे, अजय सकपाळे, सनी साळवे, रमेश कांबळे, भिमसैनिक व महिला भिमसैनिक व तथागत मित्र मंडळाचे कार्यकर्ते आणि भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भीमबांधवांना अल्पोपहार आणि पाण्याची व्यवस्था

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती चौक तुपगावात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने तुपगावात भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीतील भीमबांधवांना ज्यूस व नाश्ताची व्यवस्था व्हावी यासाठी सरपंच रवींद्र कुंभार यांनी आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ व भीम बांधवांना ज्यूस, नाश्ताची, पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

सरपंच रवींद्र कुंभार सर्व जाती-धर्माच्या सणांमध्ये उत्सवामध्ये सहभागी होऊन सर्व परीने मदत करत असतात. अशा त्यांच्या या दानशूर स्वभावामुळे व सर्व समाजाला एकत्र घेऊन एकतेचा संदेश देण्याचा प्रयत्न सातत्याने त्यांच्या माध्यमातून होत आहे. सरपंच हा लोकहिताची कामे आणि काळजी घेणारा असल्याने ग्रामस्थांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. भीम बांधवांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव या नियोजनबद्ध कार्यक्रमामुळे करण्यात येत आहे.



# सत्याग्रह महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील खारघर येथील सत्याग्रह महाविदयालय मधील शांताबाई रामराव सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२वी जयंती मोठया उत्साहात साजरी झाली. या वेळी अध्यक्षीय भाषण प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांचे झाले.

या परिसंवादात प्राचार्य डॉ. अशोक आढाव, मोहन गायकवाड, डॉ. शुभाशु भालाधरे, डॉ. प्रज्ञा डोंगरगावकर, डॉ. मिस्त्री, डॉ. निधी अग्रवाल, प्रा. संगिता जोगदंड, प्रा. अनिल गायकवाड, प्राचार्य रमेश सोनकांबळे, प्राचार्या नेहा राणे, प्रा. ललीता यशवंते, ॲड.. हर्षल शाक्य, एम. एल सुर्यवंशी यांनी नव्या शैक्षणिक धोरणाच्या विविध पैलू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यावर विचार मांडले.

या परिसंवादात व्यवसाय व्यवस्थापन सल्लागार राजेश इंगळे, प्रा. वनिता सुर्यवंशी, मोहन गायकवाड, डॉ. निधी अग्रवाल, प्रा. सोनाली सुर्यवंशी आदींनी आपले विचार मांडले.

# अमली पदार्थ विक्री करणारा आफ्रिकन नागरिक अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पासपोर्ट व व्हिसाची मुदत संपली असतानाही उलवे भागात बेकायदा वास्तव्यास असलेल्या व छुप्या पद्धतीने अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या ओंकाटे दा सिल्वा जॉर्ज (वय ३६) या आफ्रिकन नागरिकाला नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथक व एनआरआय पोलिसांनी संयुक्त कारवाई करत उलवे भागातून अटक केली. या कारवाईत पोलिसांनी आफ्रिकन नागरिकाकडून तब्बल १० लाख रुपये किमतीचे मेथाक्युलॉन हे अमली पदार्थ जप्त केले.

एनआरआय पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या आफ्रिकन देशातील ज्या नागरिकांच्या व्हिसाची मुदत संपली आहे अशा व्यक्तींच्या नावाची यादी परि- १ च्या पोलीस उपआयुक्तांनी एनआरआय पोलिसांना पाठवून दिली होती. तसेच आफ्रिकन नागरिकांच्या कागदपत्रांची तपासणी करून कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार एनआरआय पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल व त्यांचे पथक तसेच अमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस. सय्यद व त्यांचे पथक उलवे से- ३ मधील श्री बालाजी अमृत सोसायटीजवळ दाखल झाले.

याचवेळी इमारतीतून बाहेर पडणाऱ्या ओंकाटे याने पोलिसांना पाहताच तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी तत्काळ त्याला पकडले.

# रसायनीत 'रोटरी'तर्फे वैद्यकीय तपासणी शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा व अपोलो हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मोहोपाडा मुख्य बाजारपेठेतील श्री दत्त मंदिराच्या सभामंडपात करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



(छाया : राकेश खराडे)

या शिबिराचे उदघाटन ज्येष्ठ डॉ. राकेश साजवान यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रक्तशर्करा, रक्तदाब, हाडांतील कॅल्शियम, ईसीजी आदीसह इतर तपासण्या मोफत करण्यात आल्या. यात जवळपास साठपेक्षा अधिक नागरिकांनी मोफत लाभ घेतला. या वेळी अपोलो हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी आजार असणाऱ्यांना मार्गदर्शन केले. मेडिकल कॅम्पची प्रस्थावना माजी अध्यक्ष ऋतुजा भोसले यांनी केली होती.

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, सेक्रेटरी डॉ धीरज जैन, खजिनदार देवेंद्र महिंद्रीकर, माजी अध्यक्ष गणेश काळे, बाळकृष्ण होणावळे, सुनील भोसले, सदस्य शशिकांत शानबाग, मेघा कोरडे, डॉ. रमेश म्हात्रे, रमाकांत कोरडे, ॲड. अनुराधा होणावळे व फर्स्ट लेडी मित्तल शाह तर डॉ. जैन, डॉ. अमित चव्हाण, डॉ. रोहित कदम, सुभाष आहिर आदी उपस्थित होते.

या शिबिराला रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर व सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर, सरपंच माधुरी जांभळे व माजी उपसरपंच श्वेता कांबळे यांनी उपस्थित राहून तपासणी केल्या. रोटरी क्लबकडून वैद्यकीय शिबिरातून विविध महागड्या तपासण्या करण्यात आल्याने नागरिकांनी रोटरीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार मानले.

# रसायनी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती रसायनी परिसरात मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी रिस येथील सम्यक सामाजिक संस्थेच्या कार्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड यांनी संस्थेच्या वतीने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शुक्रवारी दुपारच्या सुमारास मोठ्या उत्साहात साजरी केली. सर्वप्रथम प्रकाश गायकवाड यांच्याहस्ते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून वातावरण सुगंधित करण्यात आले. यानंतर सम्यक सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांनी पुष्प व अगरबत्ती ओवाळणी करून वातावरण सुगंधित केले.

या वेळी बुद्धवंदना, बुध्ददाता होवून प्रवीण खंडागळे, महादेव कांबळे आदींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून महान कार्याची माहिती दिली.

दरम्यान, रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बाळवडकर, पोलीस नाईक विशाल झावरे यांनी कार्यक्रमस्थळी भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आशिर्वाद घेतले.

या वेळी सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाशशेठ गायकवाड, ज्येष्ठ नेते प्रवीण खंडागळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# हिमाली मोकलची तालुका कृषी अधिकारीपदी निवड

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावातील हिमाली काशिनाथ मोकल हिची तालुका कृषी अधिकारी पदी निवड झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेत चिरनेर येथील हिमाली काशिनाथ मोकल हिची तालुका कृषी अधिकारी गट ब वरिष्ठ राजपत्रित अधिकारी (महाराष्ट्र शासन) म्हणून निवड झाली आहे.



उरण तालुक्यातील इतिहास प्रसिद्ध चिरनेर गावातील हिमाली मोकल या कन्येने अथक परिश्रम व मेहनतीने सर्वप्रथम तालुका कृषी अधिकारी पदापर्यंत गरुड झेप घेतल्याने चिरनेरकरांची मान अभिमानाने उंचावली आहे. या परीक्षेत हिमालीने २६७ गुण मिळवून ती राज्यात २८ वी व मुलींमध्ये तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. दरम्यान हिमालीने दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातून बी एस सी कृषी ही पदवी प्राप्त केली असून, कृषी महाविद्यालय पुणे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी या विद्यापीठातून एम एससी प्लॅन्ट पॅथेलोजी ही पदवीदेखील संपादन केली असून, एम एस सी ला विद्यापीठातून तिने प्रथम क्रमांकाने येण्याचा बहुमान मिळविल्या बद्दल तिचा माजी राज्यपाल श्री भगतसिंह कोशियारी यांच्या हस्ते सन्मान देखील करण्यात आला होता.

हिमाली ही विज्ञान शाखेचे पदवीधर तथा एका नामांकित कंपनीचे निवृत्त कर्मचारी काशिनाथ मोकल. आणि नायब तहसीलदार म्हणून कार्यरत असलेल्या माधुरी मोकल यांची एकुलती एक कन्या आहे. दरम्यान चिरनेर गावाबरोबर तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक आदी क्षेत्रासह सर्व स्तरातून हिमालीच्या यशाचे कौतुक होत असून, शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# आर.टी.ई प्रवेशासंदर्भात आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रीया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येते. त्यानुसार आर.टी.ई प्रवेशासंदर्भात पालकांना आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२२-२३ शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रीयेची सोडत (लॉटरी) बुधवार दि. ५ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११.४५ वाजता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे येथे विद्यार्थ्यांच्या हस्ते काढण्यात आली आहे.

दि. १२ एप्रिल २०२३ रोजी दुपारी ३ नंतर ज्या बालकांची लॉटरीद्वारे २५ टक्के प्रवेशासाठी निवड झाली आहे त्या बालकांच्या पालकांना त्यांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या मोबाईल नंबरवर एसएमएस पाठविले जातील. ज्या बालकांची निवड यादीमध्ये प्रवेशासाठी निवड झाली आहे त्या बालकांच्या पालकांनी दि. १३ एप्रिल २०२३ ते दि. २५ एप्रिल २०२३ या कालावधीत पाडताळणी समितीकडे जाऊन कागदपत्रे तपासून घेऊन आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा. पडताळणी समितीने प्रवेश निश्चित केल्यानंतर पालकांनी दि. ३० एप्रिल २०२३ पर्यंत शाळेमध्ये जाऊन बालकांचा प्रवेश घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# विद्याभवन शिक्षण संकुलात विद्यार्थी शिबिर

## 'संकल्प संपूर्ण स्वास्थ्य'तर्फे उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात 'संकल्प संपूर्ण स्वास्थ्य' राज्यस्तरीय कार्यक्रमांतर्गत इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्सचे अध्यक्ष डॉ. उपेंद्र किंजवडेकर यांच्या मार्गदर्शनाने विद्याभवनमध्ये विद्यार्थी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

खाण्यापिण्याच्या सवयी, बिव्हरेजेस, व्यायाम, झोप, स्क्रीन टू ग्रीन, टेक अवे टिप्स, प्रत्यक्ष कृती अशा पाच महत्वपूर्ण गोष्टींवर या शिबिरात भर देण्यात आला. यात इयत्ता पाचवी आणि आठवीत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात आले. डॉ. उपेंद्र किंजवडेकर यांच्यासह बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रवीण मोदी, डॉ. जितेंद्र गव्हाणे, डॉ. अभिजित म्हापनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स आणि राज्य शासनादरम्यान सामंजस्य करार करण्यात आला असून यानुसार महाराष्ट्रातील शाळांमधून बालकांच्या आरोग्याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या करारानुसार तीन ते नऊ आणि दहा ते अठरा ह्या दोन वयोगटांमधील मुलामुलींची, शिक्षकांची आणि पालकांची कार्यशाळा, थेट संवाद आदी उपक्रम हाती घेतले जातील. हे उपक्रम आयोजित करण्याची जबाबदारी संपुर्णतः आयएपी ची राहणार असून राज्य शासन यासाठी संपूर्ण सहकार्य करणार आहे. विद्यार्थ्यांचा समग्र विकास घडवून आणणे या शासनाच्या धोरणास अनुसरून हा उपक्रम राबविला जाणार आहे.

या कार्यक्रमास डॉ. सुचेता किंजवडेकर, पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे संचालक दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, अस्मिता सलगर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.







**खारघर : राज्य शासनाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार थोर समाजसुधारक व ज्येष्ठ निरुपणकार डॉ. दत्तात्रेय नारायण उर्फ आप्पासाहेब धर्माधिकारी यांना रविवारी समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. या गौरव सोहळ्याच्या पूर्वतयारी नियोजनासंदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी सायंकाळी पोलीस प्रशासन व श्रीसदस्यांशी संवाद साधला.**

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २६७
www.ramprahar.com


रविवार, १६ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# ज्येष्ठ निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना आज प्रदान होणार `महाराष्ट्र भूषण`

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ निरूपणकार आणि रायगडचे सुपुत्र डॉ. दत्तात्रेय नारायण उर्फ आप्पासाहेब धर्माधिकारी यांना राज्य शासनातर्फे जाहीर झालेला प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार येत्या रविवारी (दि. १६) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते खारघर येथील कॉर्पोरेट पार्क मैदानात होणाऱ्या सोहळ्यात प्रदान केला जाणार आहे.

अध्यात्म, समाजप्रबोधन, सामाजिक कार्य, अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत राज्य सरकारकडून आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाची महाराष्ट्र भूषण या सर्वोच्च पुरस्कारासाठी घोषणा करण्यात आलेली आहे. २५ लाख रुपये रोख, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थित आप्पासाहेबांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा सोहळा येत्या रविवारी सकाळी १०.३० वाजता खारघर सेंट्रल पार्कजवळील कॉर्पोरेट पार्क मैदान येथे होणार आहे.



या सोहळयास राज्याचे सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे व सुनील तटकरे, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी, भरत गोगावले, महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, जयंत पाटील, आदिती तटकरे, अनिकेत तटकरे आणि धर्माधिकारी कुटुंबीयांची उपस्थिती असणार आहे. अंदाजे २० लाखांपेक्षा जास्त नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सोहळ्यासाठी ३०६ एकर क्षेत्रात तयारी करण्यात आली आहे. वाढत्या कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेऊन येणाऱ्या प्रत्येकाला मास्क लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. आरोग्याच्या दृष्टीने डॉक्टर, रुग्णावाहिका, औषधांचा पुरवठा तैनात ठेवण्यात येणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन दलाकडून फायर ऑडिट करुन घेण्यात येत आहे. वाहतुकीचे नियोजन, पार्किंगची व्यवस्था तसेच कार्यक्रम ठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त करण्यात आला आहे.

## मुंबई-पुणे महामार्गावर खंडाळा घाटात भीषण अपघात

# बस दरीत कोसळून १३ जणांचा मृत्यू; २८ जखमी

**खोपोली, खालापूर, पनवेल : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर खंडाळा घाटात शनिवारी (दि. १५) पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान अवघड वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे खासगी बस दरीत कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून २८ जण गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जण गोरेगाव, मुंबई येथील रहिवासी आहेत.

गोरेगाव, मुंबई येथील बाजीप्रभू वादक ग्रुप पिंपरी-पुणे येथे कार्यक्रमाकरिता शुक्रवारी गेला होता. जवळपास ४५ ते ४६ जण या ग्रुपमध्ये होते. शनिवारी रात्री एक वाजण्याच्या सुमारास पिंपरी येथून परत मुंबईकडे जाण्यासाठी बस (क्र. एमएच ०२ ईआर ८०८२)मधून निघाले होते. जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरून खोपोलीत उतरताना घाटात अवघड वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे बस दरीत कोसळली. या अपघातात बसचे अक्षरशः तुकडे झाले असून १३ जणांचा मृत्यू झाला, तर २८ जण गंभीर जखमी झाले आहेत. **(पान ५ वर..)**





### पंतप्रधानांकडून शोक व्यक्त

अपघातात मृत्यू झालेल्या प्रवाशांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली वाहिली आहे आणि अपघातातील प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजारांची मदत जाहीर केली आहे.

### मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत

या भीषण अपघाताबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या अपघातातील मृत आणि त्यांच्या कुटूंबियाप्रती सहवेदना प्रकट करून या दुर्दैवी घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केली आहे. अपघातातील जखमींची विचारपूस व प्राथमिक मदत पुरविण्यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात भेट दिली.





**पनवेल : तालुक्यातील गव्हाण, खारकोपर, शेलघर, शिवाजीनगर या चार गावांची ग्रामदेवता श्री शांतादेवी (संतुबाय)च्या यात्रा व पालखी उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांनी भेट देत देवीचे दर्शन घेतले.**



# पिक्चरमधल्या गाण्यावर कुठेही नाचो...



**गावेसे वाटलं तर निदान गुणगुणावे...बाथरुम सिंगर हुकमी जागा. नाचावेसे वाटले तर निदान टेबलावर वाजवावे...तक्षणी आणि जेथे कुठे असेल तेथे नाचावे. त्याला कसलेही वयाचे अथवा संधीचे अथवा सहवासाचे बंधन नाही. अगदी 'नाटू नाटू'वरही नाचावेसे वाटले तर नाचावे. बरं, 'आर.आर. आर. 'चा नृत्य तडका ऑस्कर पुरस्कार विजेता असल्याने आपल्या आजूबाजूच्या वाढदिवसानिमित्तच्या पार्टीपासून अगदी मराठी मनोरंजन उद्योगांच्या ग्लॅमरस इव्हेन्टसमध्येही 'नाटू नाटू'वर सिध्दार्थ (जाधव) आणि सिध्दार्थ (चांदेकर) अथवा आणखीन कोणीही (अगदी अमृता आणि सोनालीही चालेल. भारी टीआरपीची हमी.) नाचलेत तर आश्चर्य नाही. जो हिट है, वो फिट्ट है याच चालीनुसार की काय, सुनील गावसकरने 'नाटू नाटू'वर झक्कास डान्स करताना इरफान पठाणलाही दोन स्टेप्स घ्यायला लावल्या. यू ट्यूबवर या रिलला भारी लाईक्स मिळताहेत. सुनील गावस्करला राहावले नाही हेच केवढे विशेष.**




गीत संगीत व नृत्य ही फ्री लान्सिंग गोष्ट आहे. जेव्हा असं कोणी अचानक नाचते तेव्हा ती बातमी होती. अशाच काही माझ्या आठवणीतील 'सेलिब्रिटीजच्या नृत्याच्या गोष्टी.'

भारतीय क्रिकेट संघाने १९८३ साली इंग्लंडच्या लॉर्डस मैदानावर बलाढ्य वेस्ट इंडिज संघाचा पराभव करुन अनपेक्षितपणे एक दिवसीय क्रिकेट सामन्यात पहिल्यांदाच आपल्या क्रिकेट संघाने विश्व चषक जिंकला आणि आपल्या देशात एकच जल्लोष सुरू झाला. भारतीय वेळेनुसार हा सामना रात्री अकरा वाजता संपला. मुंबईत तर रात्रभर मिरवणुकीत अनेक क्रिकेट प्रेमी नाचत असतानाच राज कपूर एका फिल्मी पार्टीवरून चेंबूर परिसरातील आपल्या कॉटेजमध्ये निघाला असता याच धमाल मिरवणुकीत त्याची गाडी अडकली, पण तो राज कपूर होता. तो याचे दु:ख करीत गाडीतच बसला नाही, तोही गाडीतून उतरून नाचू लागला. त्या काळात मोबाईल असते तर हा रेकॉर्ड ब्रेक व्ह्यूअर्स मिळवणारा व्हिडिओ ठरला असता. तो वृत्तपत्रांचा काळ होता आणि मुंबईतील काही वृत्तपत्रात ही पहिल्याच पानावरची चौकटीची बातमी ठरली. गोष्टच तशी होती हो. आजूबाजूच्या सकारात्मक वातावरणाचा प्रभाव म्हणतात तो हाच.

अमिताभ बच्चनने अनेक वर्षांपूर्वी जगभरातील अनेक देशांत स्टेज शोचा असा काही धडाका अथवा तडका लावला की थट्टेत असे म्हटलं जाऊ लागले की, अमिताभ आपल्या शोसाठी जगाच्या नकाशावर नवीन देश शोधतोय. (त्या काळात त्याला 'एबी' म्हणत. अशी त्याची नामकरणे हा वेगळाच विषय.) याच शोचा शेवट अथवा क्लायमॅक्स भारी गाजला. एबीसोबत आणखीन काही स्टार, गायक, डान्सर असा बराच मोठा लवाजमा टूरवर जाई. त्यामुळे तर रंग भरत चाललेल्या शोच्या शेवटी काय हा प्रश्न महत्वाचा होता. एबी याबाबत सकारात्मक दृष्टिकोन बाळगणारा आणि अतिशय व्यावसायिक. अगदी शेवटी होते, प्रकाश मेहरा निर्मित व दिग्दर्शित 'लावारीस 'मधील मेरे अंगने तुम्हारा क्या काम है...त्याने स्वतःच गायलेले आणि त्याने जाडा/ उंच/बुटका अशी रुपेरी पडद्यावर विविध रुपे घेतलेले हे गाणे वादग्रस्त ठरले त्याहीपेक्षाही सुपर हिट ठरले... आता काही देशांतील 'शो'च्या शेवटी एबी हे गाणे गात असतानाच 'जिसकी बीवी छोटी उसका भी बडा नाम है' असे गात असतानाच जया बच्चन यांची स्टेजवर एन्ट्री होई आणि स्टेडियमभर हाऊसफुल्ल पॅक ऑडियन्स अतिशय उत्फूर्त टाळ्या, शिट्ट्यांनी वातावरण दणाणून सोडलं. आणि काहीजण उभ्या जागी नाचत...तात्कालिक फिल्मी गॉसिप्स मॅगझिनमधून यावर केवढं तरी रंगवून खुलवून लिहिलं गेले... नृत्य ही एक भारी गोष्ट आहे. आणि त्यातूनच अशा गोष्टी घडतात.




लक्ष्मीकांत बेर्डेची अशीच एक खासियत सांगतो. तो मूळचा आमचा गिरगावकर. सण संस्कृतीत भरपूर रस घेणारा. एकदा गप्पांत ओघात त्याने मला चांगली आठवण सांगितली. अभिनयाच्या क्षेत्रात येण्यापूर्वी तो गिरगावातील अनंत चतुर्थीची श्रीगणेश विसर्जनाची मिरवणूक भारी एन्जॉय करायचा. तो मला म्हणाला, या दिवशीचा कच्ची बाजा म्हणजे अतिशय धमाल. नाचायला भरपूर वाव. मी प्रार्थना समाजजवळ येऊन चांगला ढोल ताशा असेल त्या मिरवणुकीत शिरायचो आणि मस्त नाचत नाचत ऑपेरा हाऊसपर्यंत जायचो. तेथून पुन्हा मागे यायचो आणि पुन्हा प्रार्थना समाज ते ऑपेरा हाऊस असे नाचायचो. असे अनेकदा करायचो. ते दिवस आजही आठवतात, लक्ष्मीकांत बेर्डे अतिशय रंगवून खुलवून सांगायचा.

प्रदीप पटवर्धनदेखील गोकुळाष्टमीच्या गोपालकालात आमच्या गिरगावातील झावबा वाडीत मनसोक्त मनमुराद नाचायचा. आपल्या नृत्याचा तो झक्कास आनंद घ्यायचा म्हणूनच ते इतरांनाही आवडे. अहो, अनेक जण थांबून प्रदीप पटवर्धनचे गोविंदा नृत्य पाहत. त्यासाठी त्याचे फॅन्स होते. नृत्य असे कोणत्याही प्रकारचे आणि कुठेही असू देत, त्याचा रंग असा सर्वत्र जाणवणारा.

फार पूर्वीचा 'सिनेमाचा प्रेक्षक' पडद्यावर गाणे सुरु होताच आपल्या जागेवरुन उठून पडद्यासमोर नाचत. मा. भगवान अभिनित व दिग्दर्शित 'अलबेला' (१९५१) मधील 'भोली सुरत दिल के खोटे...नाम बडे और दर्शन मोठे', गाणे सुरू होताच मा. भगवानदादा आणि गीता बालीसोबत दक्षिण मुंबईतील इंपिरियल थिएटरमध्ये असे



नाचकाम घडल्याचा 'फ्लॅशबॅक' आजही सांगितला जातोय आणि यापुढेही तो सांगितला जाईल. गीतकार राजेंद्र कृष्णचे बोल आणि सी. रामचंद्र यांच्या कॅची संगीताची ती जादू. आपल्या देशातील चित्रपट रसिकांची संस्कृती अशीच भन्नाट आहे. त्या काळात अनेक चित्रपटांच्या सुपर हिट गाण्यांच्या नशिबी असे रसिकांचे प्रेम आले. कालांतराने झी स्टुडिओजच्या नागराज मंजुळे दिग्दर्शित 'सैराट' (२०१७)च्या 'झिंग झिंग झिंगाट ' गाण्याच्या वेळीही तशीच धमाल पब्लिकने एन्जॉय केली. त्यातील एक तुम्हीही नक्कीच असालच. एव्हाना चित्रपटगृहांची संस्कृती बदललेली, हायफाय मल्टीप्लेक्स कल्चर रुजलेले. जेथे एकाद्या आवडत्या हीरोच्या एन्ट्रीला टाळ्या मारल्या जात नाहीत (पूर्वी वाजत हो, मीही मारल्यात) तेथे पडद्यावरच्या गाण्याला फॉलो करत समोरच नाचायचे ही तर सांस्कृतिक क्रांतीच. पण गीत संगीत व नृत्यात काही भारी असेल तर स्वतः ला कसे रोखणार? आपल्याकडे चित्रपट एन्जॉय करणे म्हणजे एक प्रकारचा जणू सणच असतो आणि जेव्हा तो पिक्चर, त्याची गाणी आवडली की, मग स्वत:ला विसरुन 'सण'सणीत रिस्पॉन्स...

नृत्याची ही गोष्ट पडद्यावरुन अशी अनेक रंग बदलत बदलत छान पुढे चाललीय. 'नाटू नाटू' हे त्यातलं लक्षवेधक 'पुढचं पाऊल.'

# श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी - अध्यात्मविद्या आणि प्रबोधन

***सन २०२२ या वर्षीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार डॉ. श्री. दत्तात्रेय उर्फ आप्पासाहेब धर्माधिकारी यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते रविवारी (दि. १६) कॉर्पोरेट पार्क, खारघर, नवी मुंबई येथे आयोजित सोहळ्यात वितरित केला जाणार आहे. त्यानिमित्त श्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्याविषयी जाणून घेऊया या लेखातून...***



भाषण आणि निरूपण ह्या दोन शब्दांमध्ये खूप मोठा फरक आहे. भाषण ऐकून बदल घडेल हे सांगू शकत नाही, परंतु निरूपण श्रवण केल्याने माणसाच्या अंतरंगात अमुलाग्र बदल होतो हे निश्चित आहे. त्यातून जर श्री आप्पासाहेब यांच्या मौखिक निरुपणाचा प्रसाद मिळाला तर दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल. ज्यांना ज्यांना आपल्या आयुष्यात श्री आप्पासाहेब ह्यांचे मार्गदर्शन लाभले त्यांना जगण्याची योग्य दिशा मिळाली आहे हे सत्य नाकारता येऊ शकत नाही. आजपर्यंत श्री आप्पासाहेब धर्माधिकारी ह्यांना आपण स्वच्छतादूत म्हणून ओळखत होतो. आज त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने प्रदान करण्यात येणार आहे. त्यानिमित्त त्यांच्या काही व्यक्तिमत्त्व पैलूची ओळख घेतली पाहिजे.

श्री समर्थ अध्यात्मिक प्रासादिक सेवा समिती रेवदंडा अलिबाग येथून श्री आप्पासाहेब जगभर पसरलेला हा सगळा कार्यभाग सांभाळत असतात. तळागाळातील प्रत्येक मनुष्यासाठी, समाजाच्या सेवेसाठी श्री. आप्पासाहेबांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले आहे. त्यांचे अमूल्य विचार ऐकून आत्मसात करणाऱ्या श्री सदस्यांवर आलेल्या प्रसंगांमध्ये त्यांना स्थिती देऊन उभे करणे, तसेच त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे श्री आप्पासाहेब ह्याचे मूळ कार्य. या कार्याची सुरुवात त्यांचे वडील डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी ह्यांनी १९४३ सालापासून केली. ग्रंथराज श्रीमत दासबोध घराघरात जर कोणी पोहोचवला असेल तर ते आपले नानासाहेब !!!. श्रीमत दासबोध ह्या ग्रंथाचा आधार घेऊन आपल्या प्रासादिक वाणीने, मौखिक निरुपणाच्या साहाय्याने श्री नानासाहेबांनी प्रत्येकाच्या हृदयात स्थान मिळवले. आज तेच कार्य, तेवढ्याच जोमाने, तत्परतेने जगभर पोहचविण्याचे कार्य श्री आप्पासाहेब करत आहेत.

आज फक्त महाराष्ट्र नव्हे, आजूबाजूची राज्य नव्हे, फक्त भारत देश नव्हे तर अनेक देशांमध्ये ह्या मौखिक निरुपणाच्या साहाय्याने, वेगवेगळ्या भाषांमध्ये श्री समर्थ बैठका चालू आहेत. ठरलेल्या वेळेत, ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या ठिकाणी त्यांचे लाखोंच्या संख्येने असलेले सदस्य हे निरूपण ऐकण्यासाठी आवर्जून जात असतात. २५ नोव्हेंबर २००८ ह्या दिवशी खारघर नवी मुंबई येथे महाराष्ट्र भूषण सोहळ्यासाठी तब्बल ३५ लाख श्री सदस्य जमले होते अशी लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. एखाद्या इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीला लाजवेल असे हे कार्य श्री आप्पासाहेब रेवदंडा येथे बसून कसे काय करतात हे प्रत्येकासाठी आजपर्यंत न उलगडलेले कोडे आहे. दिवसेंदिवस ही सदस्य संख्या वाढत जात असताना दिसत आहे. आता महाराष्ट्रात जर सत्कार समारंभ घ्यायचा असेल आणि तिथे सर्व श्री सदस्यांना एकत्र करायचं असेल तर अशी एखादी जागा कुठे शिल्लक असेल का? असा विचार येतो. लहान मुले, स्त्रिया, पुरुष, वयोवृद्ध अशा सर्व वयोगटातील सदस्यांना ह्या श्री बैठकीमधून मार्गदर्शन मिळत असते.

अनेक प्रकारच्या व्यसनामध्ये अडकलेले लोक श्रीबैठकीतील उत्तम विचारांमुळे हळूहळू ह्या व्यसनांपासून दूर जातात, अशी कित्येक उदाहरणे ह्या श्री बैठकीत पाहायला मिळतात. अशी कोणती ताकद ह्या मौखिक निरुपणामध्ये असावी ह्याचा कोणीही अंदाज लावू शकत नाही. ठरलेल्या दिवशी एक एक करून काही मिनिटांमध्ये १०००–२००० सदस्य एकत्र येऊन हॉल भरून जातात. निरूपण चालू असताना तिथे एवढी शांतता असते की, आतमध्ये कितीजण बसले आहेत ह्याचा अंदाज बाहेरून लावायचा असेल तर रांगेत लावलेल्या चपलांवरून लागू शकतो. एवढी शिस्त, एवढी शांत बसण्याची ताकत ह्या सदस्यांमध्ये कुठून येत असेल असा प्रश्न नेहमी पडतो. म्हणजेच श्री आप्पासाहेब आपल्या अध्यात्मासोबत आचरणाबद्दल सुद्धा मौखिक निरूपण देत असतात. खरोखर जो ही शिकवण अंत:करणात घेतो त्याचे पुढील दिवस सुगीचे असतात ह्यात शंका नाही.

सतत मोबाईलमध्ये व्यस्त असलेली आताची तरुण पिढी आणि अध्यात्म निरूपण ह्याचा दूर दूर पर्यंत संबंध नसतो. पण श्री. आप्पासाहेबांच्या बैठकीमध्ये हे चित्र एकदम उलट दिसून येते. जास्तीत जास्त तरुण मुले ह्यामध्ये समाविष्ट झालेली दिसून येतात, ह्या निरुपणाची अवीट गोडी त्यांच्यामध्ये निर्माण झालेली दिसत आहे. परमार्थ हा विषय तसा खूप गहन आहे. तो समजावून घेण्यासाठी श्री. आप्पासाहेबांची साथ कायम असणे गरजेचे आहे. अध्यात्माची, ईश्वराची योग्य ती ओळख होण्यासाठी साथ लागते ती योग्य व्यक्तिमत्त्वाची आणि लाखो श्री सदस्यांच्या आयुष्यातील ते श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी आहेत.

श्रीमत दासबोध हा असा ग्रंथ आहे की, त्यामध्ये एकही चित्र नाही, वरवर वाचण्याचा प्रयत्न केला तर त्याचा खरा अर्थ कळत नाही. त्याचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल तर त्यावर अध्यात्मिक निरूपण मिळणे हे गरजेचे आहे. श्री. आप्पासाहेब ह्यांचे अध्यात्मिक ज्ञान हे वाखाणण्याजोगे आहे. श्रीमत दासबोध ह्यामध्ये समर्थ रामदास स्वामी ह्यांनी वापरलेली भाषा ही सहज कळेल अशी असली तरी त्यामध्ये अध्यात्मिक अर्थ ओतप्रोत भरलेला आहे. नेमका तोच अर्थ आप्पासाहेब आपल्या निरुपणातून काढून देत असतात. संसारात गुरफटलेल्या माणसांना पिंड ब्रह्मांडाची निर्मिती, मूळमाया, त्रिगुण, षडगुणेश्वर, अष्टधा प्रकृती, शिवशक्ती, पंचमहाभूते अश्या शब्दांचा अर्थ कळणे खूप कठीण आहे. हे शब्द कोणत्याही अभ्यासक्रमात सहजासहजी येत नाहीत, परंतु ह्या दुर्मीळ आणि अतिमहत्त्वाच्या शब्दांची माहिती असणे खूप महत्त्वाचे आहे हे जाणून श्री. आप्पासाहेब ह्यांनी मूळ ईश्वराची ओळख आपल्या निरुपणातून देण्याचा कायम प्रयत्न केलेला आहे.

**–अतिष म्हात्रे, आगरसुरे–अलिबाग**

### महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे आत्तापर्यंतचे मानकरी

| पुरस्कारीत व्यक्ती | कार्यक्षेत्र | पुरस्कारीत वर्ष |
|---|---|---|
| पु. ल. देशपांडे | साहित्य | १९९६ |
| लता मंगेशकर | कला, संगीत | १९९७ |
| विजय भटकर | विज्ञान | १९९९ |
| सुनील गावसकर | क्रीडा | २००० |
| सचिन तेंडुलकर | क्रीडा | २००१ |
| भीमसेन जोशी | कला, संगीत | २००२ |
| अभय बंग आणि राणी बंग | समाजसेवा | २००३ |
| बाबा आमटे | समाजसेवा | २००४ |
| रघुनाथ माशेलकर | विज्ञान | २००५ |
| रतन टाटा | उद्योग | २००६ |
| रा. कृ. पाटील | समाजसेवा | २००७ |
| नानासाहेब धर्माधिकारी | समाजसेवा | २००८ |
| मंगेश पाडगांवकर | साहित्य | २००८ |
| सुलोचना लाटकर | कला, सिनेमा | २००९ |
| जयंत नारळीकर | विज्ञान | २०१० |
| अनिल काकोडकर | विज्ञान | २०११ |
| बाबासाहेब पुरंदरे | साहित्य | २०१५ |
| आशा भोसले | कला, संगीत | २०२१ |
| डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी | समाजसेवा | २०२२ |

# आशिया खंडातील पहिली रेल्वे मुंबई ते ठाणे

**इंग्रज सरकारच्या काळात १८४४ मध्ये मुंबईचे आद्यशिल्पकार जगन्नाथ शंकर शेठ यांनी आगगाडी (ट्रेन) सुरु करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला इंग्रज सरकारने मान्यता दिली. मुंबईमधील बोरीबंदर ते ठाणे अशी रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी धावली. आज १७० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त विशेष लेख...**

मुंबई भारतावर दीडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले. त्यावेळी त्यांनी आपला वायपर वाढवण्यासाठी भारतात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण केल्या. इंग्रज सरकारच्या काळात १८४४ मध्ये मुंबईचे आद्यशिल्पकार जगन्नाथ शंकर शेठ यांनी आगगाडी (ट्रेन) सुरु करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला इंग्रज सरकारने मान्यता दिली. मुंबईमधील बोरीबंदर ते ठाणे अशी रेल्वे १८५३ मध्ये धावली. आशिया खंडातील ही पहिली रेल्वे आहे.

पहिल्या रेल्वेसाठी प्रयत्न सप्टेंबर १८३० मध्ये इंग्लंडमधील लिव्हरपूल ते मँचेस्टर या रेल्वेमार्गाच्या उद्घाटनाची माहिती नाना शंकरशेट यांना समजली आणि त्यांनी अशी गाडी आपल्या शहरातही हवी, असा ध्यास घेतला. मुंबईत रेल्वे सुरू करण्याची संकल्पना पहिल्यांदा नानांनी त्यांचे मित्र जमशेटजी जिजिभोय यांच्याकडे मांडली. या दोघांनी मिळून १८४५ साली 'इंडियन रेल्वे असोसिएशन'ची स्थापना केली. या माध्यमातून ते तत्कालीन ब्रिटिश सरकारला रेल्वे सुरू करण्यासाठी विविध प्रकारे समजवू लागले. ३१ ऑक्टोबर १८५० रोजी ब्रिटिशांनी मान्य करून त्यानंतर ब्रिटिश सरकारने 'ग्रेट इंडियन पेनिंन्सुल' (जी.आय.पी) या कंपनीला मुंबईपासून ते खानदेशाच्या दिशेने ५६ किमी लांबीचा रेल्वेमार्ग उभारण्याचे कंत्राट दिले होते. १६ एप्रिल १८५३ आशिया खंडातील पहिली रेल्वे ३.३५ वाजता भारतात मुंबई बोरीबंदर ते ठाणे अशी धावली. पहिल्या रेल्वेच्या शुभारंभासाठी ब्रिटिशांनी ४०० नागरिकांना निमंत्रण दिले होते. या पहिल्या रेल्वे प्रवाशांमध्ये नामदार यार्डली, जज्ज चार्लस् जॅकसन् तसेच जगन्नाथ शंकरशेठ उर्फ नाना शंकरशेठ ही यांचा समावेश होता.

रेल्वेसाठी तीन महाकाय राक्षसी इंजिन १६ एप्रिल १८५३ हा दिवस म्हणजे त्यावेळच्या भारतीयांसाठी एक चमत्कार होता. बैल – घोड्या सारख्या जनावराकडून न ओढताच धावू शकणारे हे अजब यंत्र हा त्या काळी नागरिकांसाठी वेगळा अनुभव होता. दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी आशिया खंडातील आणि भारतातील पहिली रेल्वे धावली त्यावेळी ती १४ डब्यांची होती. या डब्यांना खेचण्यासाठी सिंधू, सुलतान आणि साहिब हे तीन महाकाय राक्षसी इंजिन जोडण्यात आले होते. ही रेल्वे सुरु झाली त्यावेळी २१ तोफांची सलामी देण्यात आली होती. मुंबई ते ठाणे अंतर कापण्यासाठी तब्बल ५७ मिनिट लागले होते. पहिल्यांदाच घोडे बैलां विना गाडी धावत होती. अनेकांनी तर या गाडीला बघून नारळ फोडले तर काहींनी लोटांगण घालून नमस्कार केला आणि काही नागरिकांनी या घटनेमुळे महामारी येईल अशी अफवा सुद्धा पसरविली होती अशी इतिहासत नोंद आहेत.

त्याच वेळी सुटते आशियातील पहिली गाडी १६ एप्रिल १८५३ या दिवशी पहिली रेल्वे दुपारी ३.३५ वाजता धावली. तेव्हापासून रेल्वेमध्ये अनेक बदल झाले. रेल्वे गाड्यांचे डबे, इंजिन यात बदल होत गेले. १९२५ मध्ये पहिली विजेवर धावणारी रेल्वे सुरू झाली. त्या रेल्वे गाडीची वेळ रेल्वेकडून आजही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (उड्चढ) ते ठाणे याच स्थानकांसाठी राखून ठेवण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे त्याची दक्षता रेल्वेकडून घेतली जाते.

भारतीय रेल्वेचे जनक सप्टेंबर १८३० मध्ये इंग्लंडमधील लिव्हरपूल ते मँचेस्टर या रेल्वेमार्गाच्या उद्घाटनाची माहिती नाना शंकरशेट यांना समजली आणि त्यांनी अशी गाडी आपल्या शहरातही हवी, असा ध्यास घेतला. मुंबईत रेल्वे सुरू करण्याची संकल्पना पहिल्यांदा नानांनी त्यांचे मित्र जमशेटजी जीजीभॉय यांच्याकडे मांडली. या दोघांनी मिळून १८४५ साली 'इंडियन रेल्वे असोसिएशन'ची स्थापना केली. या माध्यमातून ते तत्कालीन ब्रिटिश सरकारला रेल्वे सुरू करण्यासाठी विविध प्रकारे समजवू लागले. त्याचाच परिपाक म्हणजे, १ ऑगस्ट १८४९ रोजी 'द ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे' (GIP रेल्वे) ची स्थापना झाली. त्यांच्या अथक प्रयत्नांतून १६ एप्रिल १८५३ रोजी आशिया खंडातील पहिली रेल्वे बोरीबंदर ते ठाणे या लोहमार्गावर धावली. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना 'भारतीय रेल्वेचे जनक' म्हणून ओळखले जाते.

**(साभार : इटिव्हीभारत)**



# वडखळ येथे भीषण अपघात

## दोन वाहनांच्या धडकेत एक ठार, एक गंभीर

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर वडखळ गावच्या हद्दीत वडखळ त मुंबई जाणाऱ्या दुचाकीला मागून ट्रकची धडक बसून या अपघातात दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून मागे बसलेला इसमाचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार असे समजते की, फिर्यादी साबीर सलीम तालवानी रा. कुर्ला ईस्ट नेहरूनगर, मुंबई हे त्यांच्या ताब्यातील स्कुटी नं.एमएच ०३ डी.आर.१४६६ यावर गुरवारी (दि.१३) सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मृत प्रशांत शशिकांत सुरते (वय २८) याला गाडीवर पाठीमागे डबलसीट घेऊन वडखळ येथून मुंबईकडे जात असताना वडखळच्या हद्दीत फ्लायओव्हर ब्रिजखाली मुंबई गोवा हायवे रोडवर जाणाऱ्या बायपास रोडवर पेण येथे आले असता त्यांच्या स्कुटीच्या पाठीमागून येणाऱ्या ट्रक नं.एम.एच.२० सीटी ८७५० वरील आरोपी चालक भारत मधुकर गीते (वय ३१) रा. औरंगाबाद याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून फिर्यादी यांच्या स्कुटीला पाठिमागून जोरदार धडक मारली. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार मंगेश धुपकर करीत आहेत.

### ट्रकचालक पळाला

या अपघातात फिर्यादी साबीर तालवानी (वय २४) व मयत प्रशांत सुरते (वय २८) हे स्कुटीसह खाली पडले असताना चालकाने ट्रक हयगयीने अविचाराने चालवून प्रशांत सुरते यांच्या अंगावरून व फिर्यादी यांच्या पायावरून ट्रक गेल्याने प्रशांत सुरते गंभीर जखमी होवून मरण पावले तर फिर्यादी हे गंभीर जखमी झाले आहेत. या वेळी ट्रकचालक अपघातस्थळी न थांबता पळून गेला.

# पेणजवळील बळवली येथे वाहनांची एकमेकांना धडक

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर पेणजवळील बळवली गावच्या हद्दीत भरधाव सिमेंट मिक्सर टँकरने पुढे जाणाऱ्या टँकरला धडक दिल्याने या अपघातात दोन्ही टँकरचे नुकसान झाले आहे.

फिर्यादी महंमद नदीम अतहर अली रा.फणस डोंगरी, पेण यांच्या ताब्यातील टेम्पो नंबर एम.एच.०५ एएम १९२५ हा शुक्रवार दिनांक १४ एप्रिल रोजी दुपारी १:५० वाजण्याच्या सुमारास कोपर ते बळवली असा चालवीत घेऊन जात असताना बळवली फाटा येथे आल्यावर बळवली गावाकडे गाडी वळवीत असताना पेण ते पनवेल असा मुंबई गोवा हायवे रोडने जाणाऱ्या सिमेंट मिक्सर टँकर नंबर एमएच १२ के.पी. ८१६१ यावरील आरोपी चालक याने त्याच्या ताब्यातील टँकर हा चालवीत घेऊन जात असताना रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून गाडी हयगयीने, अविचाराने व धोकादायक रित्या चालवून पुढे जाणाऱ्या टेम्पोस पाठीमागून ठोकर मारल्याने टेम्पो दुभाजकामध्ये पलटी होऊन अपघात झाला व दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. याबाबत दादर सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास महिला पोलीस हवालदार सारिका पाटील हे करीत आहेत.

**दोन्ही वाहनांचे नुकसान**

# खोपोलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव उत्साहात

## अभिवादन करण्यासाठी भीम अनुयायांची गर्दी



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सयुंक्त जयंती महोत्सव खोपोली नगरपरिषदेच्यावतीने जल्लोषात सुरू असून डॉ. आंबेडकरांच्या भव्य पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी भीमअनुयायांनी गर्दी केली होती.

शुक्रवारी सकाळी १० वाजता भारतीय बौध्दमहासभा आणि भारतीय बौध्दमहासंघ यांच्यावतीने बुध्दवंदना झाल्यानंतर ११.३० वा जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, पालिकेचे मुख्याधिकारी, प्रशासक अनुप दुरे, पोलीस निरिक्षक शिरीष पवार,माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर, डॉ. सुनील पाटील, मा. उपनगराध्यक्ष कुलदिपक शेंडे, मा. नगरसेवक किशोर पानसरे, राजू गायकवाड, कैलास गायकवाड़, मा. नगरसेविका केविना गायकवाड, माधवी रिठे, प्रिया जाधव, कार्यलयीन आधिकारी मिनल जाधव उपस्थित होते. प्रस्ताविक उपमुख्याधिकारी गौतम भगळे यांनी केले. डॉ. आंबेडकरांच्या जिवनावर अभ्यासपूर्ण भाषण आम. महेंद्र थोरवे यांनी करीत खोपोलीत जमलेल्या भीम अनुयायांची गर्दी पाहता चैत्यभूमिचे स्वरूप आल्याचे आमदार थोरवे म्हणाले. जयंतीनिमित्ताने अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्यावतीने जनजागृती सुरू आहे याची पाहणी मान्यवरांनी केली. शहरातील काजुवाडी, मोहनवाडी, प्रकाश नगर, भानवज बौध्दवाडा आणि रिक्षा संघटनेने मिरवणूक काढली होती.

# राजपुरी कोळीवाडा येथे मच्छिमार जेट्टीच्या कामाचे भूमिपूजन

### ॲड. महेश मोहिते यांची उपस्थिती

**मुरुड : प्रतिनिधी**

राजपुरी कोळीवाडा परिसरात असंख्य मच्छिमार नौका असून सुद्धा मच्छिमारांसाठी जेट्टी उपलब्ध नव्हती त्यामुळे होड्या किनाऱ्याला लावणे खूप कठीण बाब बनली होती. याबाबत अनेक मच्छिमारांनी भाजपचे माजी जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले होते. याबाबत ॲड. महेश मोहिते यांनी पक्षाच्या मंत्र्यांकडे योग्य पाठपुरावा मत्सविभागाकडून या जेट्टीसाठी ९ कोटी १८ लाख रुपये मंजूर करून आणले आहेत.

राजपुरी येथील मत्सविभागाकडून मंजूर झालेल्या या कामाचे भूमिपूजन भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्याकडून करण्यात आले.



**मत्स्यविभागाकडून जेट्टीसाठी ९ कोटी १८ लाख रुपये मंजूर**

भूमिपूजन कार्यक्रमासाठी भाजपा मुरुड तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर, शिवसेना मुरुड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, जिल्हा संघटिका शुभांगी करडे, जेष्ठ नेते नरहरी गिदी, माजी सरपंच विजय गिदी, भाई सुर्वे, अल्काताई मोन्नाक,शैलेश काते, महेश मानकर, दीपक गिते, मुरुड तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, सरपंच हिरकणी गिदी, युवा मोर्चाचे अध्यक्ष समीर शिंदे, गणेश कट आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ॲड. महेश मोहिते म्हणाले, राजपुरी कोळीवाडा परिसरासाठी अनेक वर्षांपासून मच्छिमार जेट्टीची आवश्यकता होती. राजकारणापलीकडचे व्यक्तिमत्व स्वर्गीय कृष्णा गिदी साहेब यांचे स्वप्न होते कि, या ठिकाणी जेट्टी असावी.लोक आग्रहास्तव मंत्री महोदयांनी हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी यावेळी ऋण व्यक्त केले.

चौकट

मच्छिमारांचे स्वप्न साकार

जेट्टीमुळे स्थानिक मच्छिमारांना आपल्या बोटी किनाऱ्याला साकारणे सहज सोपे होणार आहे. पर्यटक यांच्यासाठी जेट्टी झाली परंतु मच्छिमारांना जेट्टी नव्हती ते स्वप्न साकार होत असल्याचा आनंद यावेळी त्यांनी व्यक्त केला. राज्य शासन मच्छिमारांच्या हिताचे निर्णय घेत असून लवकरच इतर मदत सुद्धा राज्य शासनाकडून देत मच्छिमारांना ताकद देण्याचे काम राज्य शासन करत असल्याचे मोहिते यांनी सांगितले.

# महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रमास मोठ्या संख्येने श्री सदस्य खारघर येथे जाणार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना नवी मुंबई खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रम १६ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता होत आहे. या कार्यक्रमास रेवदंडा-चौलसह पंचक्रोशीतील असंख्य श्री सदस्य उपस्थित राहतील असे संकेत मिळत आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र भूषण कार्यक्रम महाराष्ट्र शासन नवी मुंबई खारघर येथे पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांस मोठ्या संख्येने श्री सदस्य तेथे जाणार असल्याचे संकेत दिले जात आहेत.

जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना मानाचा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार दिला जात आहे, यांचा आनंद सर्व श्री सदस्यांमध्ये आहे. या कार्यक्रमांस शिस्तबध्द व नियोजन पध्दतीने श्री सदस्य उपस्थित राहणार आहेत. नवी मुंबई-खारघर येथे जाण्यासाठी श्री सदस्यांची तयारी जोरदार सुरु असून हा सोहळा याची डोळा पहाण्याचा आनंद घेण्यास श्री सदस्य उत्सूक आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवशी रेवदंडा निवासस्थानी दिलेल्या सदिच्छा भेटीत महाराष्ट्र भूषण पुरस्काराची घोषणा केली होती. यावेळी श्री सदस्यांनी मोठा आनंद व्यक्त केला होता.

# एमएसआरडीसीचे लक्ष वेधण्यासाठी पालीतील तरुणांचे अनोखे आंदोलन

**सुधागड : प्रतिनिधी**

वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम जवळपास पूर्णत्वास आले आहे. मात्र या मार्गावरील पाली अंबा नदी वरील नव्या पुलाचे काम चार वर्षांपासून सुरू आहे. ते आजतागायत झालेले नाही. शिवाय जुन्या पुलाची दुरवस्था झाली आहे. याकडे एमएसआरडीसी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पालीतील तरुणांनी शुक्रवारी (दि.१४) अनोखे आंदोलन केले. यावेळी प्रतिकात्मकरीत्या या दोन्ही पुलांची आजारी असल्या प्रमाणे डॉक्टरने तपासणी केली आणि ओषधगोळ्या दिल्या, सलाईन लावली व मलमपट्टी देखील केली.



पालीतील तरुण अमित निंबाळकर, प्रवीण पालकर तुषार ठोंबरे व अभिजीत ठोंबरे या तरुणांनी हे अनोखे आंदोलन केले. किमान आता तरी प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे व नवीन पुलाचे काम लवकर पुर्ण करावे अशी मागणी केली. जुन्या पुलावरून क्षमतेपेक्षा अधिक अवजड वाहतूक होते. शिवाय लोखंडी संरक्षक रेलिंग देखील तुटल्या आहेत. यामुळे प्रवासाच्या दृष्टीने हा जुना पूल धोकादायक झाला आहे. त्याचीही दुरुस्ती केली जात नसल्याने प्रवासी व नागरिकांमध्ये असंतोष आहे. या तरुणांनी या आंदोलनाचा व्हिडीओ बनवून तो समाज माध्यमांवर देखील टाकण्यात आला आहे. त्यास अनेकांनी लाईक्स व कमेंट देखील केल्या आहेत.

पान १ वरून

## बस दरीत कोसळून १३ मृत्यूमुखी; २८ जखमी

अपघाताची माहिती मिळताच शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा, अपघातग्रस्त मदत पथक आयआरबी देवदूत पथक, बोरगाव वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस तातडीने घटनास्थळी मदत पोहचले. रोपच्या सहाय्याने दरीतून मुख्य रस्त्यापर्यंत आणण्यासाठी बचाव पथकाने प्रचंड मेहनत घेतली.

मृतांमध्ये बसचालक हरिरतन सोपान यादव (वय ४०, जोगेश्वरी, मुंबई), जुई दिपक सावंत (वय १८, गोरेगाव, मुंबई), यश सुभाष यादव (वय १७, गोरेगाव, मुंबई), विर कमलेश मांडवकर (वय ८, गोरेगाव, मुंबई), वैभवी साबळे (वय २०, गोरेगाव, मुंबई), स्वप्नील श्रीधर धुमाळ (वय १६, गोरेगाव, मुंबई), सतिश श्रीधर धुमाळ (वय २५, गोरेगाव, मुंबई), मनीष राठोड (वय २५, गोरेगाव, मुंबई), कृतिक लोहित (वय १६, गोरेगाव, मुंबई), राहुल गोठण (वय १७, गोरेगाव, मुंबई), हर्षदा परदेशी (वय १९, माहिम, मुंबई), अभय विजय साबळे (वय २० मालाड, मुंबई), अनिकेत संजय जगताप (वय २६, गोरेगाव, मुंबई) यांचा समावेश आहे.

तर जखमींमध्ये आशिष विजय गुरव (वय १९, दहिसर मुंबई), यश अनंत सकपाळ (वय १७, गोरेगाव, मुंबई), जयेश तुकाराम नरळकर (वय २४, कांदिवली, मुंबई), वृषभ रवींद्र कोरबे (वय १७, गोरेगाव, मुंबई), रुचिका सुनील डुमणे (वय १७, गोरेगाव, मुंबई), आशिष विजय गुरव (वय १९, दहिसर, मुंबई), ओंकार जितेंद्र पवार (वय २५ खोपोली, रायगड), संकेत चौधरी (वय ४०, गोरेगाव, मुंबई), रोशन शेलार (वय ३५, मुंबई), विशाल अशोक विश्वकर्मा (वय २३, गोरेगाव, मुंबई), निखिल संजय पारकर वय १८ मुंबइ), युसुफ मुनीर खान (वय १३, मुंबई), कोमल बाळकृष्ण चिले (वय १५, सांताक्रुज, मुंबई), अभिजीत दत्तात्रेय जोशी (वय २०, गोरेगाव मुंबई), मोहक दिलीप सालप (वय १८, मुंबई), दिपक विश्वकर्मा (वय २०, गोरेगाव मुंबई), सुरेश बाळाराम अरोमुक्कंम (वय १८, गोरेगाव, मुंबई), नम्रत रघुनाथ गावनुक (वय १८, गोरेगाव, मुंबई), चंद्रकांत महादेव गुडेकर (वय २९, गोरेगाव, मुंबई), तुषार चंद्रकांत गावडे, (वय २२, गोरेगाव, मुंबई), हर्ष अर्जुन फाळके (वय १९, विरार), महेश हिरामण म्हात्रे (वय २०, गोरेगाव, मुंबई), लवकुश रणजीतकुमार प्रजापती (वय १६, गोरेगाव, मुंबई), शुभम सुभाष गुडेकर (वय २२, गोरेगाव, मुंबई), ओम मनीष कदम (वय १८, गोरेगाव, मुंबई), मुसेफ मोईन खान (वय २१, गोरेगाव, मुंबई) व सनी ओमप्रकाश राघव (वय २१, खोपोली, रायगड) यांचा समावेश असून त्यांच्यावर पनवेल येथील एमजीएम रुग्णालय, खोपोली नगरपालिका रुग्णालय व जाकोटिया रुग्णालय खोपोली येथे उपचार सुरू आहेत.

अपघाताबाबत माहिती मिळताच तातडीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अपघाताची माहिती घेऊन एमजीएम रुग्णालयात जखमींची भेट घेतली. त्याचप्रमाणे मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत, तर जखमींवर शासकीय खर्चाने उपचार करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. यानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. अपघातानंतर तातडीने मदतकार्य करणाऱ्या हायकर्स आणि आयआरबी टीममधील तरुणांशी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली व त्यांचे कौतुक केले.

# ...आणि खोपोलीकर मदतीसाठी सरसावले!

## 'त्या' अपघातातील जखमींना वाचवण्यासाठी प्रशासन, सामाजिक संघटनांचे एकीचे बळ



**खोपोली : प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर खासगी बस दरीत कोसळून तब्बल १३ जणांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. १५) पहाटेच्या सुमारास घडली. शिंग्रोबाच्या वरील बाजूच्या रस्त्यावरून पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सुमारे ४२ प्रवासी या बसमधून प्रवास करीत होते. पहाटे चार वाजता पोलीस यंत्रणेने खोपोलीतील सर्व सामाजिक संस्थाना कॉल केले आणि बघता बघता काही वेळात सर्व खोपोलीकर जणू काही आपल्या घरातील माणूस असल्यासारखे तिथे मदतीस धावले.

प्रथमतः गुरू साठीलकर यांच्या नेतृत्वातील अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी या सामाजिक संस्थेतील सदस्य दरीत उतरून जखमी प्रवाशांना बाहेर काढण्यास सुरुवात केली.

बरोबरच यशवंती हायकर्स या संस्थेचे सर्व मेंबर आपल्या बचाव सामुग्रीसह तिथे उपस्थित राहून जखमी प्रवाशांना दरीतून रोपच्या सहायाने बाहेर काढण्यास सुरुवात केली. तसेच शिवदुर्ग लोणावळा ही टीमही घटनास्थळी मतदसाठी पोहचली.

पद्माकर गायकवाड यशवंती हायकर्स, सुनील गायकवाड शिवदुर्ग, पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या टिमनेही या मतदकार्यात सहभाग घेतला. असे सर्व जण पहाटे ४ ते ५ पासून तिथे काम करत होते आणि अगदी दुपार झाली तरी या सर्व खोपोलीकरांच्या चेहऱ्यावर तसूभरही दमछाक दिसत नव्हती. हे सर्व काम करत असताना खोपोलीतील बहुसंख्य तरुण मदतीसाठी येत होते. सहज सेवाचे शेखर जांभळेही तिथे मदतीला धावले होते.

### तहसीलदार, मुख्याधिकारी धावले मदतीसाठी

*खोपोली पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी, उपाअधीक्षक शुक्ला व पवार यांच्या नेतृत्वाखाली सर्व काम करीत होते. त्याच बरोबर फायर ब्रिगेड व देवदूतचे सर्व लोक होतीच. तहसीलदार तांबोळी व मुख्याधिकारी अनुप दूरे यांची टीमही घटनास्थळी तत्काळ पोहचली आणि मदतीला सुरुवात केली.*

### बिस्टीक, केळी, पाण्याची केली मदत

*परिसरातील सर्व ॲम्बुलन्स जागेवर येत होत्या व तत्काळ मदत करत होत्या. कोणी खोपोलीकर पाणी आणून देत होते. कोणी बिस्कीट तर कोणी केळी. ज्याच्या त्याच्या परीने जेवढी होईल तेवढी मदत सर्व खोपोलीकर करीत होते.*

### सामाजिक संघटना सरसावल्या

*जसे बचाव टीम घाटात काम करत होत्या. तसेच खोपोलीतील काही नागरिक खोपोली नगरपरिषद हॉस्पिटलमध्ये जखमींना मदत करत होते. खोपोलीतील काही डॉक्टरची टीम तिथे मदतीला होती. तसेच काही सामाजिक संघटना जखमींना मुंबईकडील हॉस्पिटलकडे पाठवत होते.*


### आमदार महेंद्र थोरवे यांनीही दिला मदतीचा हात

*यशवंती हॅकर्स टीम काम करत असताना, भक्ती साठीलकरने हॅण्ड ग्लोव्हज आणून दिले. शेखरने काम करणाऱ्यांचे हात मोकळे नाही म्हणून एकमेकांना हाताने भरवले अशा अनेक गोष्टी तिथे होत होत्या. काही पत्रकार मित्र पाणी आणून देत होते. सर्व पत्रकार आज पत्रकार नसून खोपोलीकर होते. आमदार महेंद्र थोरवे तिथे आले असता त्यांनीही पाण्याचे बॉक्स घेवून आले.*

इथे कुणी वैयक्तिक काम करत नव्हते. सर्व एकत्रितपणे काम एकमेकांना सांभाळून, एकमेकांना जिथे कमी पडेल तिथे मदत करत होते. जे आहोत ते आपण सर्व आणि जे जखमी आहेत ते आपलेच असे समजून काम करत होते.

## निवडक

### पनवेल परिसरातून रिक्षाची चोरी



**पनवेल :** शहरातील सिद्धार्थ मार्केट इमारतीत येथे उभी केलेली रिक्षा पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून शहरातील मुख्य भागातून होत असलेल्या चोरीच्या प्रकरणामुळे वाहनमालकांमध्ये भीतीयुक्त वातावरण पसरले आहे. शहरातील सिद्धार्थ मार्केट इमारतीत राहणारे सिद्धार्थ गोरेगावकर यांनी त्यांच्या मालकीची रिक्षा (क्र. एमएच ४६ एझेड ८६४१) हि उभी ठेवली असता आज पहाटेच्या सुमारास सदर रिक्षाचे लॉक तोडून चोरून नेली आहे. याबाबतचे चित्रीकरण सिसिटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाले आहे. याबाबत सिद्धार्थ गोरेगावकर यांनी चोरीची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

### धानसर गावात चोरीचा प्रयत्न

**पनवेल :** तालुक्यातील धानसर गावात असलेले जिओ टॉवरमधील राउटरचे कव्हर काढुन स्कुड्रावरने खोलुन चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. धानसर गावातील म्हात्रे ओपन प्लॉट येथे असलेल्या जिओ टॉवरचा ५जी राउटरचे कव्हर काढुन स्कुड्रायवरने खोलुन आरोपी विशाल विजय चाळके याने स्वत:चे फायद्याकरीता चोरी करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात विशाल चाळकेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

### खारघरमध्ये बेकायदा बांधकाम जमीनदोस्त

**पनवेल :** खारघर सेक्टर २८, २९, ३१, ३२, ३३ आदी भागांत असलेले बेकायदा बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले. सिडकोच्या अतिक्रमणविरोधी पथकाच्या मुख्य नियंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये बेकायदा ढाबे, चाळी, खाद्यपदार्थांच्या टपऱ्या, भंगाराची दुकाने, नर्सरी, पत्राशेड आदींवर कारवाई करण्यात आली. सिडकोच्या जागेवर प्रचलित नियमांचा भंग करून ही बांधकामे करण्यात आल्याचे सिडकोच्या अनधिकृत बांधकामविरोधी पथकाकडून सांगण्यात आले. सिडकोच्या मुख्य दक्षता अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच, पोलीस, सिडकोचे सुरक्षारक्षक, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षारक्षक यांच्या संरक्षणात ही कारवाई करण्यात आली. एक जेसीबी, एक ट्रक, एक जीप आणि १० कामगार आदींच्या मदतीने ही मोहीम राबवण्यात आली.

# समाजोपयोगी कार्यक्रम राबवून जनतेची सेवा करा

- भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे आवाहन
- आपटा येथे मोफत आरोग्य तपासणी, औषध वाटप शिबिर





(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजोपयोगी कार्यक्रम राबवून जनतेची सेवा करा, असे आवाहन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी आपटा येथे आरोग्य शिबिरावेळी कार्यकर्त्यांना केले.

उरण विधानसभा भारतीय जनता पक्ष, एमजीएम हॉस्पिटल कामोठे-कळंबोली आणि आपटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने शनिवारी (दि. १५) मोफत आरोग्य तपासणी आणि औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या शिबिराचा ४०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.

पनवेल आणि उरण तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून नागरीकांना सुविधा देण्यात काम त्यांच्या माध्यमातून सुरू आहे. त्याअंतर्गत आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून तसेच भारतीय जनता पक्ष, एमजीएम हॉस्पिटल कामोठे-कळंबोली आणि आपटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आपटा येथे शनिवारी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी आणि औषध वाटप शिबिर झाले.

या शिबिरामध्ये रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळाला असून आरोग्य तपासणी, औषधोपचार, शस्त्रक्रिया, नेत्रतपासणी व चष्मे वाटप, कृत्रिम हात व पाय बसविण्यात आले. तसेच रुग्नांसाठी सामान्य तपासणी, शल्यचिकित्सा, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, त्वचारोग, कान, नाक, घसा, नेत्ररोग, दंतचिकित्सा, औषधे, फिजिओथेरपिस्ट, रक्त तपासणी, इसीजी या सेवा उपलब्ध होत्या. या शिबिराचा ४०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर घरत, भाजपचे केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, अॅड. संजय टेंबे, गुळसूंदे जि. प. अध्यक्ष प्रवीण खंडागळे, सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील माळी, आपटा ग्रामपंचायतीच्या सरपंच नाझनी पटेल, जांभिवली ग्रामपंचायतीच्या सरपंच रिया कोंडिलकर, माजी सरपंच शिवाजी माळी, आरोग्य केंद्राच्या डॉ. माने, दिघाटीचे माजी सरपंच अमित पाटील, आपटाचे माजी सरपंच दत्ता पाटील, माजी सरपंच विजय मुरुकुटे, ग्रामपंचायत सदस्य माधव कांबळे, कीर्ती कदम संदीप पाटील, भगवान देशमुख, जीवन टाकले, कमलाकर टाकले, किर्ती कदम, आसद पिट्ये, सुहास कदम, महादेव कांबळे, ज्ञानेश्वर भोईर, उमेश पाटील, डॉ. अश्लेषा तावडे, डॉ. जीवन उरणकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शांतादेवीची यात्रा उत्साहात

**मान्यवरांची उपस्थिती; आयोजकांकडून स्वागत**









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण पंचक्रोशीतील गव्हाण, कोपर, शिवाजीनगर आणि शेलघर या चार गावांची ग्रामदेवता असलेल्या श्री शांतादेवी (संतुबाय)ची यात्रा दोन दिवस मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात झाली. या यात्रेला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. शनिवारी (दि. १५) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी अर्चना ठाकूर, सुपूत्र आदेश ठाकूर यांनी भेट देत देवीचे दर्शन घेतले.

आयोजकांनी यात्रा व पालखी सोहळ्याला आलेल्या सर्व मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देत स्वागत केले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, भाजप वाहतुक सेलचे हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, अनंता ठाकूर, वसंत म्हात्रे, अशोक कडू, आशिष घरत, श्रीकांत देशमुख, परशुराम शेठ, वामन ठाकूर, किसन पाटील आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेलमध्ये डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम

**परेश ठाकूर यांच्याकडून विविध ठिकाणी अभिवादन**











(छाया : प्रफुल्ल कांबळे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, सामाजिक क्रांतीचे नेतृत्व करणारे प्रमुख योद्धे, अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२वी जयंती शुक्रवारी (दि. १४) पनवेल तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आयोजित ठिकठिकाणच्या कार्यक्रमांना भेट देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

या वेळी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पंचशील नगर बुद्ध विहार, नवीन पनवेल, दत्तात्रेय स्पोर्ट्स क्लब खांदा कॉलनी, मोराज सामाजिक क्रिडा मंडळ तक्का, तक्का परिसर, शिवाजी नगर यांसह विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना भेट देत अभिवादन केले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, अजय बहिरा, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, मोराज सोसायटी येथे कुलदीप तांबे, उपाध्यक्ष संतोष कांबळे, आनंद चव्हाण, संदेश दिवे, निटेश तांबे, प्रतीक मोहिते, करण कांबळे, अतुल माने, राजेश थळे, गणेश सोनावणे, खांदा कॉलनी येथे मयूर वाघमारे, नितीन ढेकळे, सचिव सुशांत साबळे, सचिन सातपुते, गणेश बेलकर, निवृत्ती निबुदे, तक्का परिसरात मंगेश सावंत, चिमाणे साहेब, बबन कांबळे, मिलीन कांबळे, उमेश खाडे, संदीप तांबे, संजय बोराडे, शिवाजी भगत, अस्लाम शेख, मयूर आंग्रे आणि पंचशील नगर येथे शंकर वायदंडे, कुंडलिक माघडे, रवी रत्नपारखी, रतन नेमाडे, अशोक आखाडे, गणेश पराड, कांताबाई वानखेडे, रामदास खरात, विनोद खंडागळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, नवीन पनवेल येथे माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी आतोजीत केलेल्या सांस्कृतीक कार्यक्रमाला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत डॉ. बाबासाहेब आंबडकर यांना अभिवादन केले.

## ऑक्सि पार्कचे आज उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाउंडेशनच्या संकल्पनेतून पनवेलमध्ये साकारण्यात आलेल्या ऑक्सिपार्कचे उद्घाटन रविवारी (दि.१६) सायंकाळी ६.३० वा. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते व आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

पनवेलमधील पर्यावरणीय प्रगतीशील परिवर्तनाला चालना देण्यासाठी आणि सकारात्मक वातावरणीय बदल करण्यासाठी कोशिश फाऊंडेशनच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या ऑक्सिपार्क या आगळ्यावेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनासाठी यशस्वी प्रयत्न केले जात आहेत. नागरिकांसाठी सामुदायिक पोषक जागा, शहराच्या विकासाबद्दल नागरिकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, शहराचे वाढते तापमान कमी करणे, तसेच ऑक्सिजनचे प्रमाण वाढविणे आणि शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी ऑक्सिपार्क महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे या ऑक्सिपार्कच्या लोकार्पण सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, खजिनदार अभिजित जाधव, सचिव अॅड. चेतन जाधव, उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, सदस्य नितीन पाटील, सत्यवान नाईक, चिन्मय समेळ, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप यांनी केले आहे.

## महामानवाच्या जयंतीदिनी पुस्तकांचे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वांचेच आदर्श आहेत. त्यामुळे त्यांची जयंती भारतातच नाही तर संपूर्ण विश्वात साजरी केली जाते. प्रत्येक जण दरवर्षी आपापल्या पद्धतीने भीम जयंती मोठ्या उत्साहात साजरी केल्याचे आपल्याला आढळून येते. शासकीय अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. नीलिमा अरविंद मोरे व बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल येथे कार्यरत असलेले अरविंद मोरे या दाम्पत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे माझी आत्मकथा हे पुस्तक पनवेलच्या भीम नगर वस्तीत वाटप करून भीम जयंती साजरी केली.

या वेळी मोरे दाम्पत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कसे पुस्तक प्रेमी होते व त्यांनी पुस्तकासाठी राजगृह बांधणारे ते एकमेव महामानव असल्याचे सांगितले. ते अहोरात्र पुस्तकाचे अध्ययन करीत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पुस्तक वाचूनच घडले. माझी आत्मकथा हे पुस्तक त्यांचे संपूर्ण आत्मचरित्र आहे. मोरे दाम्पत्य म्हणाले की, हे पुस्तक वाचून नक्कीच लहानापासून तर मोठ्यांपर्यंत सर्वांना प्रेरणादायी आहे. जर आपण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श घेऊन जास्तीत जास्त पुस्तकांचे अध्ययन केले तर आपण खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी ठरणार आहोत व एक सुसंस्कृत नागरिक घडणार आहोत.

भीमनगर, पनवेल येथील उपस्थित नागरिकांनी मोरे दाम्पत्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम बघून आनंदित झाले व त्यांनी ह्या उपक्रमाचे स्वागत करून आनंद व्यक्त करून मोरे दाम्पत्याचे आभार मानले.

## महिला सक्षमीकरण उपजीविका प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात



**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील पडघे गाव येथे आझादी का अमृत महोत्सव याचा एक भाग म्हणून पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि बामर लॉरी अँड कंपनी लि. अंतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम म्हणून सक्षम फाउंडेशन सोबत महिला सक्षमीकरण शाश्वत उपजीविका हा प्रकल्प सुरू केला होता. याचा दुसरा टप्पा आझादी का अमृत महोत्सव उत्सवाच्या दुसऱ्या वर्षाचा भाग म्हणून फेज २ या प्रकल्पाचे उद्घझाटन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय उपसचिव ए.एन.झा यांच्या हस्ते झाले.

प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी, उद्योजकता निर्माण असे या प्रकल्पाचे स्वरूप असून या अंतर्गत पडघे येथे शाश्वत उपजीविकेसाठी पाच बचत गट तसेच आदिवासी महिलांचे गट बनवून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील पडघे व फणसवाडी गाव या ठिकाणातून सुमारे ७५ वंचित महिलांना कार्यक्रमाचा लाभ होणार आहे.

यापूर्वी बामर लॉरी यांनी ४०० वंचित महिलांसाठी टेलरिंग, केक मेकिंग, मेहंदी, अॅडव्हान्स ब्लाउज मेकिंग, कापडी पिशव्या व गोधडी बनवणे, साडी कव्हर, बटवा पाऊच बनवणे इ प्रशिक्षण कार्यक्रम सक्षम फाउंडेशन च्या माध्यमातून राबवले आहेत. या प्रकल्पाविषयी बोलताना बालमेरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आदिका रत्न शेखर यांनी सांगितले की, कंपनीच्या उन्नतीसाठी कंपनी बामर लॉरीच्या युनिट्स आणि आस्थापनांच्या आसपास राहणारे समुदाय यांच्या विकासासाठी काम करत राहील. आझादी का अमृत महोत्सव म्हणून विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

या वेळी बामर लॉरी कंपनीचे असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट, जेम्स पॉल, हेड सीएसआर दिलीप दास, प्लांट हेड श्री. कमलेश, ऑपरेशन हेड एस पी सिंग, एचआर विभागाचे सुभाष अगवणे, सक्षम फाउंडेशनच्या शुभांगी कदम, अॅड. तृप्ती कदम, शंकर आपटे, राजेश पुरोहित, कविता गाढे, ज्योती कांबळे, पूनम भोईर, सुजाता पवार, अदिती पाटील, भाजप नेते कृष्णा पाटील आदी उपस्थित होते.

# चौलमधील ताडगोळ्यांना पर्यटकांची पसंती

## ● ऐन उन्हाळ्यात मोठी मागणी ; स्थानिकांना आर्थिक उत्पन्न देणारे साधन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलमधील ताडगोळे पर्यटकांची खास पंसती असून मोठी मागणी ऐन उन्हाळ्यात असते. चौल परिसरात 'ताडगोळे' ची असंख्य झाडे असून ताडगोळे विक्रीतून मोठे उत्पन्न स्थानिक साधतात.



ऐन उन्हाळ्याचे दिवसात ताडगोळे थंडावा म्हणून पंसतीचे असते, त्यामुळेच मुंबई, पुणे, ठाणे आदी शहरातून तसेच परिसरातून आलेले पर्यटक तसेच स्थानिकवर्ग ताडगोळे खरेदी करत असल्याचे चित्र रेवदंडा-चौल बाजारपेठेत दिसते. चौलमध्ये नारळ पोफळीच्या बागेसह ताडाची झाडे सुध्दा मोठ्या प्रमाणात असून त्याला येणाऱ्या नारळा सारख्या फळांना ताडगोळे म्हणतात.

या फळांतला गर पाणीदार व चवदार असून उंच ताडाच्या झाडावर चढून काढण्याचा व फळांतील गर काढण्यास कस लागतो. उन्हाळ्यात येत असलेल्या ताडगोळ्यांना बाजारात चांगली मागणी असते. उन्हाळ्याचे दिवसात अंगाची लाही लाही होत असताना नैसर्गिक थंडावा देणारे ताडगोळे शरिरातील पाण्याचे प्रमाण टिकवून धरतात. अंगातील उष्णता कमी करणाऱ्या ताडगोळ्यांचे आयुर्वेदातही अनेक औषधी उपयोग सांगितले आहेत. या फळाच्या सेवनाने शरिराला आवश्यक असलेले क्षार व इतर पोषक तत्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात,ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यात सतत पुरळ येत असेल,तसेच ज्याना या दिवसात चेहऱ्यावर मुरूमे येत असतील त्याच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोग प्रतिरोधी तत्वे असून विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले जाते.

या फळामध्ये अॅथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे मिळविण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसामध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे, वाढत्या उकाढयात सध्या सारेच हैराण झाले असतात, घश्याला पडणाऱ्या कोरडवर उपाय म्हणून बाजारातील शितपेय किंवा बर्फाचे गोळ्यांवर ताव मारतात, परंतू कृत्रिम थंडाव्या पेक्षा ताडगोळ्यांसारखा नैसर्गिक उपाय केव्हाही आरोग्यासाठी चांगलाच परिणामकारक ठरतो. ज्याना वजन घटवायचे असेल त्याच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे तसेच फळातील रसामुळे भूक शमविण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार खाण्याची इच्छा होत नाही. ज्याना लिव्हरच्या संबधीत काही विकार असतील त्याचेसाठी ताडगोळयांचे सेवन उपयुक्त आहे. या फळामध्ये पोटॅशियम मुबक मात्रेमध्ये असून लिव्हर मध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनाने शरिराला श्रम करण्याची आवश्यक ताकद व उर्जा मिळते. या फळाच्या सेवनाने शरिरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्याने दिवसभरासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनातून मिळत असते.

### ताड वृक्षाच्या लागवडीची गरज

***अशा या गुणकारी ताडगोळे फळांची फार मोठी मागणी उन्हाळ्यात पर्यटक व स्थानिक वर्ग करत असतो. चौल परिसरात आर्थिक उत्पन्न देणारे ताडवृक्ष असंख्य संख्येने असून या ताडाच्या वृक्षाच्या लागवड करणे दिवसेंदिवस गरजेचे आहे.***

### आरोग्यासाठी गुणकारी

***ताडगोळे हे फळ ठराविक ऋतूमध्ये म्हणजे उन्हाळ्यात उपलब्ध असणारे फळ आहे. यांची चव काहीशी शहाळातील मलई सारखी लागत असून चवीला हे फळ फारच मधूर असते. इंग्रजी भाषेत 'आईस ॲपल' म्हणून ओळखले जाणारे फळ आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते.***

# पेणमध्ये सौर कृषी पंप योजनेद्वारे ठिबक सिंचन योजना यशस्वी

## शेतकऱ्यांकडून सोलर योजनेची पहाणी



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील सापोली पिंपळगाव येथील शेतकरी अनिल काणेकर यांनी जून २०१९ मध्ये आपल्या सव्वा एकर शेतीमध्ये मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजने अंतर्गत ३ एचपी डीसी सोलर पंपची योजना राबविली. त्या योजनेमार्फत २०२३ पर्यंत त्यांनी ५० हापूस आंब्याची कलमे लागवड केली. या कलमांना ठिबक सिंचन द्वारे नियमित पाणी पुरवठा केला जात आहे. तर ५ हजार पक्षांचे कुंकुटपालन करण्याकरिता उत्तम पाणी पुरवठा या सौर कृषी पंप योजनेमुळे होत आहे.

शिवाय सोलर पंपावर चालणारी एक हात पंपाची विहिरही बांधण्यात आली आहे. त्या विहिरीला सौर कृषी पंप जोडण्यात आला आहे. या विहिरीची आजूबाजूच्या गावातील शेतकर्यांनी पाहणी करून त्यापासून प्रेरणा घेऊन आपल्या शेतात ही योजना कशी राबवता येईल या संदर्भात मार्गदर्शन घेत आहेत. या महाराष्ट्र शासनाच्या योजनेमुळे शेजारील शेतकऱ्यांच्या शेतातून आपल्या शेतापर्यंत लाईट पोलसाठीचा अडथळा, शेतकऱ्यांना विजेची बचत, व शून्य वीज बिल तसेच अविरत पाणीपुरवठा अशी सोय झाली आहे.

त्याचप्रमाणे यापुर्वीही अनिल काणेकर यांनी त्यांच्या दिड एकर शेतीमध्ये ड्रम सिडर पध्दतीने भात लागवड करुन जास्तीत जास्त भाताचे उत्पादन मिळविले होते. यासाठी त्यांना खूप कमी प्रमाणात मजूरीचा खर्च आला. एकूणच अनिल काणेकर यांच्या भात शेतीचे उत्पादन पहाण्यासाठी व सोलर कृषी पंप योजना तसेच ठिबक सिंचन योजना पहाण्यासाठी जिल्हा कृषि अधिकारी उज्वला बानखेले, उपविभागीय अधिकारी कैलास वानखेडे, विस्तार अधिकारी, व्ही. एस. लाडगे यांनी भेटी देवून सोलर कृषि पंप योजनेची पहाणी केली. याचबरोबर आलेली लाईट व पाण्याची समस्या सुटल्यामुळे उत्पादनात भरघोस वाढ झाली आहे. तसेच आजूबाजूचे शेतकरीही त्यांची कृषी पंप योजना पहाण्यासाठी भेट देत आहेत.

सौर कृषी पंपाच्या माध्यमातून शेतकरी अनिल काणेकर यांनी चांगल्या प्रकारे योजना राबविली असून यामुळे विजेची बचत होण्यास मदत झाली असून हि योजना इतरही शेतकऱ्यांनी आपल्या शेतात राबवावी असे आवाहन विस्तार अधिकारी व्ही. एस. लाडगे यांनी केले आहे.

# दुरटोलीजवळील छोट्या पुलाला संरक्षक कठडे नसल्यामुळे अपघाताची शक्यता

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील वरसगांव ते भिरा मार्गावरील दुरटोली गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील छोट्या पुलाला संरक्षक कठडे नसल्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. याकडे संबंधित विभागाने लक्ष देऊन या पुलावर संरक्षण कठडे बसविण्यात यावे अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.

या मार्गावरून दुरटोली, गौळवाडी (विजयनगर), कामथ या गावांकडे जाण्यासाठी येथील रस्त्याचा वापर केला जातो. त्यामुळे या रस्त्यावरील असणाऱ्या छोट्या पुलाला संरक्षक कठडे नसल्यामुळे वाहन चालकांसह प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. या मार्गांवरून टूव्हीलर, रिक्षा, मिनिडोअर, फोरव्हिलर गाड्या येजा करीत असतात. रस्ता अरुंद असल्यामुळे पुलावर दोन्ही बाजूकडील दोन वाहने एकत्रित आली असता गाडी बाजूला घेण्याच्या नादात या पुलाला संरक्षण कठडे नसल्यामुळे वाहन पुलावरून खाली जाऊन मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे. शासनाकडून नेहमीच बोलले जाते कि गाव कोठेही असुदे गाव तेथे रस्ता झालाच पाहिजे. परंतु त्या रस्त्यावर प्रवाश्यांना अनेक समस्याना तोंड दयावे लागत आहे. एकतर रस्त्यावर असणारे असंख्य खड्डे, पुलाला नसणारे संरक्षण कठडे यामुळे अपघात होतात याला जबाबदार कोण? अशी मागणीही केली जात आहे.



# जेएसएमच्या विद्यार्थ्यांचे महामानवास आगळवेगळे अभिवादन

## ▮ चार दिवस दररोज आठ तास अभ्यास; २५०हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीपासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपर्यंत दररोज ८ तास असे ४ दिवस अभ्यासपर्व उपक्रमाचे आयोजन यानिमित्ताने जेएसएम महाविद्यालयाच्या ग्रंथालयात यावेळी करण्यात आले होते. सलग चार दिवस राबवलेल्या या उपक्रमामध्ये एकूण २५० हून अधिक विद्यार्थ्यांनी दररोज ८ तास वाचन करून आपला सहभाग नोंदवला.



या उपक्रमाची सांगता जनता शिक्षण मंडळ, अलिबागचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी कार्यक्रमाने झाली. यावेळी गौतम पाटील यांनी डॉ. बाबासाहेब यांचे देशाच्या जडणघडणीतील योगदानाबद्दल, तसेच बाबासाहेबांनी 'वाचाल तर वाचाल' हा संदेश विद्यार्थ्यांना का दिला याबद्दल अतिशय समर्पक असे मार्गदर्शन केले आणि कोकण एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून तळागाळातील लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध केल्याचा इतिहास त्यांनी यावेळी उलगडला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या बाबासाहेबांच्या संदेशाबद्दल तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा, पत्रकारिता, समाजकारण, अर्थकारण देशाच्या संविधान निर्मितीतील त्यांचे योगदान यावर प्रकाश टाकला. जगामध्ये डॉ. बाबासाहेबांना 'ज्ञानाचे प्रतीक' म्हणून ओळखले जाते याविषयीचा उहापोह त्यांनी यावेळी केला.

प्रमुख मार्गदर्शक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. ईश्वर कोकणे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांनी देशातील प्रत्येक घटकांना शिक्षण मिळावे यासाठी पुण्यामध्ये १८४८ मध्ये मुलींच्या शाळेच्या निर्मितीपासून ते आयुष्यभर केलेले कार्य ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गोलमेज परिषदेतील प्रतिनिधित्व, जातीय निवाड्यातील स्वतंत्र मतदार संघाची मागणी पदरात पाडून घेणे, अस्पृश्यता नष्ट करण्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवतावादी दृष्टिकोन उलगडला. गुरु शिष्याची जयंती एकत्र साजरी होत आहे यासाठी समाधान व्यक्त केले. उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे ग्रंथालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग आणि डी.एल.एल.ई. विभागाद्वारे संयुक्तपणे करण्यात आले यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विविध ग्रंथसंपदेचे पुस्तक प्रदर्शनही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात भरविण्यात आले होते. तसेच सकाळी समाज कल्याण विभागातर्फे आयोजित पदयात्रेत महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी येथे डॉ. आंबेडकर जयंती साजरी



**चौक : प्रतिनिधी**


ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. सरपंच अनिल जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. ग्रामसेवक व खालापूर ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष प्रशांत कदम उपस्थित होते.

या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आपले विचार व्यक्त करतांना सांगितले, महामानव क्रांतीसुर्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या संविधानामुळे आपण आपले जिवन जगत आहोत, त्यांच्यामुळे सर्वांना न्याय मिळाला, हे आपण कधीच विसरू शकत नाही. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात डी.एल.एल.ई.युनीट आणि एन.एस.एस.युनीट यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने डॉ. एस.आर कान्हेकर यांच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे देशविकासातील योगदान या विषयावरील आभासी (ऑनलाईन) स्वरुपातील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.




प्रमुख वक्ते डॉ. एस.आर. कान्हेकर यांनी बाबासाहेबांना अभिवादन करीत बाबासाहेबांच्या जन्मापासून त्यांच्या संपूर्ण जीवन कारकिर्दीवर प्रकाश टाकत बाबासाहेबांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व अत्यंत सहज-सोप्या शब्दांत श्रोत्यांना उलगडून सांगितले. त्यांनी अविरत अभ्यास करुन मिळविलेल्या जवळजवळ ३२ पदव्या, सामाजिक विषमता, जाचक रूढी- परंपरा नष्ट व्हाव्या म्हणून केलेले विविध सत्याग्रह, मजुर, महिला, शेतकरी या साऱ्यांच्या भल्याचा विचार करताना विविध सवलतींचा केलेला पाठपुरावा, मतदानाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची घटनेतील केलेली तरतुद आदींची माहिती डॉ.कान्हेकर यांनी दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी बाबासाहेबांच्या पवित्र स्मृतींना आदरांजली वाहात राज्यघटनेच्या निर्मितीतील सहभागासोबतच शिक्षण, समाज, अर्थ आदी क्षेत्रातील बाबासाहेबांच्या अमूल्य योगदानावर प्रकाश टाकत बाबासाहेबांचे आचार- विचार याची रूजवणूक युवा पिढीत करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला डी.एल.एल.ई.युनीटचे समन्वयक डॉ. देवीदास बामणे यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळत महामानवाला विनम्र अभिवादन करत व्याख्यानात सहभागी सर्वांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी डॉ. तुकाराम माळवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वदपमधील रिक्षाचालकाकडून प्रवाशांना मोफत प्रवासी सेवा

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे निमित्त**

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वदप गावातील भीमराव गायकवाड या रिक्षाचालक असलेल्या आंबेडकरी चळवळीमधील कार्यकर्ते यांनी शुक्रवारी प्रवाशांना मोफत रिक्षा वाहतूक सेवा दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कर्जत शहरात आणि जांभिवलीकडे जाणाऱ्या प्रवाशी यांच्यासाठी मोफत प्रवासी सेवा दिली.



कर्जत तालुक्यातील वदप गावचे रहिवासी भीमराव गायकवाड हे कर्जत शहरात रिक्षा चालक म्हणून सेवा देत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर त्यांचे नितांत प्रेम आहे. त्यामुळे त्यांनी सलग दुसऱ्या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मोफत प्रवासी सेवा देत आहेत. त्यासाठी त्यांनी आपल्या रिक्षाच्या मागे आणि पुढे मोफत सेवा देण्याचे फलक लावले होते. त्यामुळे सकाळपासून भीमराव गायकवाड या रिक्षाचालक असलेल्या चालकाच्या सेवा देण्याचे काम केले.

आज दिवसभर प्रवाशांना सेवा दिली असून त्यांच्या या सेवेचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# पेण येथील आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून १३ एप्रिल रोजी पेण शहर बौद्धजन पंचायत समितीच्या माध्यमातून हर्षोन्नती फाउंडेशन मुंबई यांच्यावतीने पेण येथे काळजी आपल्या आरोग्याची या अभियानाअंतर्गत संबोधन व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिराकरिता डॉक्टर सुप्रिया चिखलेकर यांनी वयोमानानुसार कशा पद्धतीने आजार होतो आणि त्याची काय काळजी घ्यायची याची संबोधनात्मक माहिती दिली तर डॉ. अनिकेत खोत यांनी अमवात, संधिवातावरील रुग्णांची तपासणी करून वैद सर्वेश गायकवाड यांनी आयुर्वेदाबाबत माहिती सांगितली.

यावेळी डॉ. श्रेयश माळी, डॉ. कृष्णा पवार, डॉ. अमोल जोधले आदि डॉक्टरांनी आलेले जेष्ठ नागरिक, महिला वर्ग यासह इतरही नागरिकांची आरोग्य तपासणी केली.

पेण येथील संबोधन व आरोग्य तपासणी शिबिराला बहुजन पंचायत समितीचे शहराध्यक्ष गौतम गाडेकर, उपाध्यक्ष राजेश जाधव, सचिव गंगाराम गायकवाड, चंदन अहिरे, विशाल कांबळे, कविता वाघमारे, कविता गायकवाड, कैलास जाधव, नागेश सुर्वे, पांडुरंग मोरे आदिंनी या शिबिरासाठी मेहनत घेतली.

# हैदराबादचा कोलकातावर रोमांचक विजय

## हॅरी ब्रुकने झळकावले शतक

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १९व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा सामना सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर शुक्रवारी झाला. या सामन्यात फलंदाजाचा बोलबाला जास्त होता हैदराबादकडून सलामीवीर हॅरी ब्रुकने आयपीएल २०२३ हंगामातील पहिले शतक झळकावले. त्याच्या शतकाच्या जोरावर हैदराबादने कोलकातासमोर २२९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. त्याचा पाठलाग करताना रिंकू सिंग, नितीश राणा यांनी धुव्वाधार फलंदाजी करत अर्धशतके झळकावली, मात्र सामना २३ धावांनी गमावला.



धावांचा पाठलाग करताना कोलकाताची सुरुवात खराब झाली. रहमानउल्ला गुरबाजने खातेही उघडले नाही. पहिल्याच चेंडूवर भुवनेश्वर कुमारने त्याला बाद केले. कोलकाता नाईट रायडर्सला त्यांच्या घरच्या मैदानावर ईडन गार्डन्सवर पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्याचा सनरायझर्स हैदराबादने २३ धावांनी पराभव केला. कोलकाताला शेवटच्या षटकात ३२ धावांची गरज होती. रिंकू सिंग आणि शार्दुल ठाकूर क्रीजवर होते. रिंकूने गुजरातविरुद्ध शेवटच्या षटकात २९ धावांचा पाठलाग केला होता, मात्र या वेळी चमत्कार घडला नाही. शेवटच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर उमेश यादव बाद झाला. त्यानंतर केवळ आठ धावा झाल्या. रिंकूने षटकार मारला पण तो पुरेसा नव्हता.

कोलकाताचा कर्णधार नितीश राणाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सनरायझर्सने २० षटकांत चार बाद २२८ धावा केल्या. प्रत्युत्तरात कोलकाता नाईट रायडर्सला २० षटकांत सात गडी गमावून २०५ धावाच करता आल्या. रिंकू सिंगने ३१ चेंडूत ५८ धावा केल्यानंतर नाबाद राहिली. त्याने आपल्या खेळीत चार चौकार आणि चार षटकार मारले. कर्णधार नितीश राणाने ४१ चेंडूंत ७५ धावांची खेळी केली. एन. जगदीशनने २१ चेंडूत ३६ धावा केल्या. शार्दुल ठाकूरने १२ आणि व्यंकटेश अय्यरने १० धावांचे योगदान दिले. आंद्रे रसेल तीन धावा करून बाद झाला, तर उमेश यादव एक धाव करून नाबाद राहिला. रहमानउल्ला गुरबाज आणि सुनील नरेन यांना खातेही उघडता आले नाही.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना सनरायझर्स हैदराबादला हॅरी ब्रूक आणि मयंक अग्रवाल यांनी चांगली सुरुवात केली. मयंक केवळ न नऊ धावा करून बाद झाला, पण हॅरी ब्रूक वेगाने धावा करताना दिसला, त्याने या आयपीएल हंगामातील पहिले शतक ठोकले. त्यालाच सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. त्याचा साथीदार राहुल त्रिपाठी नऊ धावा करून बाद झाला. यानंतर कर्णधार एडन मार्करामने हॅरी ब्रूकसह तिसऱ्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केली. एडन मार्कराम ५० धावा करून बाद झाला. ब्रूक आणि अभिषेकने ३३ चेंडूत ७२ धावांची भागीदारी केली. अभिषेक १७ चेंडूत ३२ धावा करून बाद झाला. या विजयासह हैदराबादचे गुणतालिकेत चार गुण झाले आहेत.

### रायगड प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धा

# जंजिरा चॅलेंजर्स, रायगड वॉरियर्स संघ विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील आरसीएफच्या मैदानावर सुरू असलेल्या रायगड प्रीमियर लिग २५ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेतल्या साखळी फेरीतील सामन्यात शुक्रवारी जंजिरा चॅलेंजर्स संघांनी खांदेरी-उंदेरी किंग्स संघावर ७८ धावांनी विजय मिळवला आहे.

प्रथम नाणेफेक जिंकून फलंदाजीला आलेल्या जंजिरा चायलेंजर्स संघांनी २० षटकांमध्ये सात गडी गमावत १६१ धावा फलकावर नोंदवल्या. अवघ्या ३९ चेंडूंचा सामना करीत पाच षटकार आणि तीन चौकार ऋषिकेश राऊत यांनी ठोकले. खांदेरी-उंदेरी किंग्सकडून निकुंज विठलानी यांनी दोन फलंदाज बाद केले. प्रतिउत्तरात खांदेरी-उंदेरी किंग्स संघांनी १३.२ षटकांमध्ये ८२ धावसंख्याच उभारू शकले. निकुंज विठलानीच्या २६ धावा वगळता कोणताही फलंदाज टिकाव धरू शकला नाही. जंजिरा चॅलेंजर्सकडून ऋषभ बुजबळ, सिद्धार्थ म्हात्रे, रिझवान खान यांनी प्रत्येकी तीन फलंदाज बाद केले. जंजिरा चॅलेंजर्स संघांनी साखळी फेरीत चारही सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला आहे.






दुसऱ्या सामन्यात रायगड वॉरियर्सने द्रोणागिरी मास्टर्सचा चार गडी राखून पराभव केला. द्रोणागिरी मास्टर्सने प्रथम फलंदाजी करीत सर्व गडी गमावत १२७ धावा केल्या. यश मानेने ३६ तर विशाल सकपाळने २६ धावा केल्या. रायगड वॉरियर्सकडून हार्दिक कुरुंगळे यांनी तीन फलंदाज बाद केले. प्रत्युत्तरात रायगड वॉरियर्सने १६.५ षटकांमध्ये सहा गडी गमावत १२७ धावांचे लक्ष पार केले. ओम जाधव यांनी सर्वाधिक ४०, स्वानंद कदम ३० तर अजिंक्य रसाळ यांनी २५ धावांची खेळी केली. ऋषिकेश राऊत व हार्दिक कुरुंगळे यांना सामनावीर म्हणून आरपीएलचे सचिव जयंत नाईक, अभिजित तुळपुळे, अक्षय गुळेकर, संदेश गुंजाळ, शैलेश घरत, संदिप जोशी, ॲड. पंकज पंडित यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# गावदेवी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन






**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही गावदेवी प्रीमियर लीग पनवेल २०२३ क्रिकेट स्पर्धेचे शानदार उद्घाटन करण्यात आले.

यंदाचे या स्पर्धेचे नववे वर्ष होते. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप नेते व के. डी. पाटील कंट्रक्शन अँड डेव्हलपर्सचे विनोद पाटील, श्री स्वामी समर्थ मठाचे मठाधिपती सुधाकर घरत, पत्रकार संजय कदम, मनसे पनवेल उपाध्यक्ष संदीप कृष्णा पाटील, आयोजक शंतनू घरत, ऋतिक बताले, अरुण मडवी, जागृत भोईर, नयन पांचाळ, आदेश घरत, अनुराग विकी, ओंकार, श्रीकांत ओमी भोपी, महेश सुतार, अरुण भोपी, अवधूत घरत आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा बुद्धिबळ संघ निवड स्पर्धा उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेतर्फे ९, १७ आणि१९ वर्षांखालील मुलांचा व मुलींच्या जिल्हा संघ निवड स्पर्धा नुकतीच भाग्यलक्ष्मी हॉल, अलिबाग येथे रॅपिड पद्धतीने घेण्यात आली.

या स्पर्धेत ९ वर्षांखालील गटात आयान मोडक प्रथम तर आयुष खाडे याने द्वितीय क्रमांक पटकाविला. मुलींच्या गटात आरोही पाटील प्रथम तर ओजस्वी थळे हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. उत्तेजनार्थ बक्षीस आरोही गणेश गवळी हिला देण्यात आले. हा संघ गट ५ ते ७ मे दरम्यान



नागपूर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी रवाना होईल.

१३ वर्षांखालील गटात श्राव्य अनिल गावंड प्रथम, तर अविनाश चिंचोलकर द्वितीय त्याचप्रमाणे मुलींच्या गटात अपेक्षा मारभल प्रथम, शर्वरी पाटील द्वितीय व आर्या मयूर पानसरे हिने तृतीय क्रमांक पटकाविला. १७ वर्षांखालील गटात सर्वेश करडे प्रथम, अथर्व वाघ द्वितीय तर अमेय मंगेश घरत याने तृतीय क्रमांक पटकाविला.

मुलींच्या गटात पल्लवी पाटील प्रथम ती ज्ञानदा गुजराथी हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. १७ वर्षांखालील गट बुलढाणा राज्य स्पर्धेसाठी रवाना होणार आहे. सर्व यशस्वी स्पर्धकांना ट्रॉफी देवून सन्मानित करण्यात आले.

या वेळी रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे विलास म्हात्रे, राजेश्री घरत, सिनियर नॅशनल पंच पनवेल चंद्रशेखर पाटील, बुद्धिबळ प्रशिक्षक समीर परांजपे, किशोर देशपांडे, मिलिंद बोधनकर, राहुल रहाळकर, मयूर पानसरे, तरनुंम मोडक हे उपस्थित होते. स्पर्धा प्रमुख पंच म्हणून सुशील गुरव यांनी काम पाहिले, तर संमिल गुरव, आविष्कार मारभल, अथर्व दातार यांनी पंच म्हणून काम पाहिले. सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

# जसप्रित बुमराह लवकरच परतणार मैदानात



## बीसीसीआयची माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा घातक गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे टीम इंडिया आणि आयपीएलमधून बाहेर आहे. सध्या देशात आयपीएल सुरू आहे आणि त्यानंतर टीम इंडियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल खेळण्यासाठी इंग्लंडला रवाना होणार आहे. यापूर्वी बुमराह आगामी एकदिवसीय विश्वचषक २०२३पूर्वी फिट होऊ शकतो, असा विश्वास बीसीसीआयने व्यक्त केला आहे.

जागतिक कसोटी चॅम्पियनशिपनंतर भारतीय संघ आगामी विश्वचषक स्पर्धेच्या तयारीला सुरुवात करेल. जसप्रीत बुमराहने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना ऑस्ट्रेलियासोबत २५ सप्टेंबर २०२२मध्ये खेळला होता. या मालिकेपूर्वीही तो जखमी झाला होता आणि त्यानंतर या मालिकेने तो आणखी जखमी झाला. अशा स्थितीत आता त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागणार असली तरी तो विश्वचषक खेळू शकतो, असा विश्वास बीसीसीआयला आहे.

पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, जसप्रीत बुमराह आगामी एकदिवसीय विश्वचषक २०२३पूर्वी फिट होऊ शकतो. बीसीसीआयला विश्वास आहे की, बुमराह पूर्णपणे तंदुरुस्त होईल आणि त्याच्या रंगात दिसेल.

# दिल्लीविरोधात विराट कोहलीचे अर्धशतक



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारताचा माजी कर्णधार विराट कोहली बराच काळ बॅड पॅचमध्ये होता, मात्र आता विराट कोहली पुन्हा एकदा जुन्या अवतारात परतला आहे. कोहलीने आयपीएल हंगामाची सुरुवात दमदार केली होती. दिल्लीविरूद्धच्या सामन्यात विराटने शनिवारी (दि. १५) अर्धशतकी खेळी केली.

विराटने आयपीएलच्या सुरुवातीपासूनच मुंबई इंडियन्सविरूद्धच्या पहिल्याच सामन्यात ४९ चेंडूत नाबाद ८२ धावांची धडाकेबाज खेळी केली. यानंतर केकेआरविरूद्ध त्याला २१ धावांच्या पुढे मजल मारता आली नाही, मात्र लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध ४४ चेंडूत ६१ धावा केल्या. पाठोपाठ दिल्लीविरूद्ध अर्धशतकी खेळी करीत पहिल्या चार सामन्यात तीन अर्धशतके ठोकली. कोहलीने आयपीएलच्या पहिल्या चार सामन्यात ७१.३३च्या सरासरीने २०० धावा केल्या आहेत. त्याचे स्ट्राईक रेट हे १४७.५८ इतके आहे.

# वॉकर घेऊन ऋषभ पंत संघाचे मनोबल वाढवण्यासाठी उतरला मैदानात




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२३मध्ये दिल्ली कॅपिटल्स संघ खराब फॉर्मशी झुंजत आहे. नियमित कर्णधार ऋषभ पंतशिवाय संघाला पहिल्या चार सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे संघाचे मनोबल वाढविण्यासाठी शुक्रवारी हातात वॉकर घेऊन ऋषभ पंत मैदानावर उतरला.

बंगळुरूमध्ये ऋषभ पंतने आपल्या सहकाऱ्यांना भेटण्याची आणि संघाच्या शिबिरात सहभागी होण्याची संधी सोडली नाही. याशिवाय लग्नासाठी एक आठवड्याची रजा घेऊन गेल्या आठवड्यात मायदेशी परतलेला ऑस्ट्रेलियन अष्टपैलू मिचेल मार्शही संघात परतला आहे.

मिचेल मार्शने मोसमातील सुरुवातीचे दोन सामने खेळले आणि लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या पहिल्या सामन्यात तो गोल्डन डकवर बाद झाला. यानंतर गुजरात टायटन्सविरुद्ध त्याने चार चेंडूत केवळ चार धावा केल्या. यानंतर तो लग्नासाठी मायदेशी परतला. आयपीएलपूर्वी भारताविरुद्धच्या वन डे मालिकेत मार्शची बॅट ज्या प्रकारे तळपत होती, त्याच पद्धतीने तो दिल्ली कॅपिटल्ससाठी फलंदाजी करेल, अशी अपेक्षा होती, पण ती सध्या फोल ठरली. त्याचवेळी डगआउटमधील पुन्हा एकदा ऋषभ पंतची उपस्थिती संघाचे मनोबल वाढवू शकते.

# राष्ट्रीय खेळाडू शिवराम पवार यांचे निधन



**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे आणि मुंबईच्या अमर भारत मंडळाचे राष्ट्रीय खेळाडू शिवराम उर्फ शिवा पवार यांचे शुक्रवारी (दि. १४) रात्रौ ९.१५ वा. च्या सुमारास दीर्घ आजाराने रहात्या घरी निधन झाले. गेले बरेच दिवस ते आजारी होते. नव्वदीकडे झुकलेल्या पवार यांना वार्धक्य व आजारामुळे बाहेर फिरणे जमत नव्हते. शिवा पवार यांनी भारतीय रेल्वे संघाचे १२ वर्ष प्रतिनिधित्व केले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

१९५७साली पवार मुंबई जिल्हा संघात आले. दोन वर्षे ते मुंबईकडून खेळले. १९५९साली ते मध्य रेल्वेच्या सेवेत रुजू झाले. १९७२पर्यंत ते भारतीय रेल्वेकडून राष्ट्रीय स्पर्धेत खेळले. या कालावधीत त्यांनी रेल्वेला महाराष्ट्रा विरुद्ध काही अनपेक्षित विजय मिळवून दिले. सत्तरचे दशक त्यांनी आपल्या अष्टपैलू खेळाने गाजविले. राष्ट्रीय स्पर्धेबरोबरच इतर स्पर्धेतदेखील त्यांनी आपला ठसा उमटविला. आपले ज्येष्ठ बंधू राजाराम पवार यांच्या बरोबरीने अमर भारत या संघाकडून राज्य व अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धेतदेखील बक्षिसांची लयलूट करीत त्यांनी आपल्या खेळाची चुणूक दाखविली होती.

# नवी मुंबईत युवराज चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

जुईनगर येथे मनसे विद्यार्थी सेना आयोजित युवराज चषक २०२३ या तीन दिवसीय क्रिकेट सामन्यांचे मनविसेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन शुक्रवारी (दि. १४) झाले. या वेळी अमित ठाकरे यांनी स्वतः क्रिकेट खेळून आनंद लुटला.

मनसे पदाधिकाऱ्यांनी वाशी टोल नाकापासूनच भव्य फोर व्हिलर आणि बाईक रॅली काढून अमित ठाकरेंचे स्वागत केले. या स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होणार असून या स्पर्धेत सर्व सहभागी संघाना तीन साखळी सामने खेळण्याची संधी मिळणार आहे. सर्व सहभागी संघातील खेळाडूंना त्यांच्या नावाची जर्सीदेखील देण्यात आल्याचे मनविसे शहर अध्यक्ष संदेश डोंगरे यांनी सांगितले. उद्घाटन सोहळ्यास मनसे सरचिटणीस किर्तीकुमार शिंदे, मनसे प्रवक्ते व नवी मुंबई शहराध्यक्ष गजानन काळे, मनविसे सरचिटणीस अखिल चित्रे, संदीप पाचंगे, ॲड. सायली सोनवणे, मनविसे राज्य सचिव ॲड. अक्षय काशीद, महेश ओवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या क्रिकेट सामन्यांचा बक्षीस वितरण सोहळा रविवारी (दि. १६) सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांसह होणार आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com